सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शिवसेना शेतकरी सेना जिल्हाप्रमुखपदी प्रा. मिरगाळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ एप्रिल -**

शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हाप्रमुख पदी प्रा. अण्णासाहेब पंचप्पा मिरगाळे यांची निवड शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या हस्ते करण्यात आली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी केलेले सामाजिक व राजकीय काम पाहून शिवसेनेच्या शेतकरी सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी प्रा. अण्णासाहेब पंचप्पा मिरगाळे यांची निवड शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या हस्ते करण्यात आली.



यावेळी विलास लंगर जिल्हाप्रमुख शेतकरी सेना, शिवसेनेचे निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, औसा विधानसभेचे तालुकाप्रमुख शिवाजी चव्हाण, स्वामी इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल शिवसेनेचे नेते तथा समाजसेवक लिंबन महाराज रेशमे, शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटिका जयश्री उटगे, शिवसेनेच्या माजी जिल्हाप्रमुख डॉ. शोभा बेंजरगे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बजरंग दादा जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भागवत वंगे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मुकेश सुडे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा व अभिनंदन केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### स्वामी समर्थांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**अहमदपूर, दि.२७ एप्रिल -**

अहमदपूर शहरातील ब्राह्मण गल्ली मधील नागेंद्र भारती मठामध्ये श्री स्वामी समर्थांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. ब्रंमाडनायक अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ हे अहमदपूर येथील नागेंद्र भारती मठामध्ये सहा वर्षे वास्तव्यास होते. नागेंद्र भारती यांना गुरु करून स्वामी समर्थ हे शिष्य म्हणून राहिले काही काळ मठाधिपती म्हणून याच गादीवर बसले होते. अशा जाज्वल्य असलेल्या नागेंद्र भारती मठामध्ये श्री स्वामी समर्थाची पुण्यतिथीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अहमदपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, ॲड. अजिंक्य चामे, कुलदीप हाके, नगरसेवक अभय मिरकले, स्वरूप चिरके, संकेत म्हाळस, मठाधिपती रमेश भारती, बालाजी गिरी, सोमनाथ गिरी, श्रीधर गिरी, बालाजी बन, संजय भारती, सोनू भारती, शंभूदेव भारती, अरुण गिरी, संजय भारती, बळी पुरी, चंचल गिरी यांच्या सह स्वामी समर्थांचे भक्त गण उपस्थित होते.



### प्रा. मोतीपवळे यांच्याकडून भोपणीकर परिवाराचे सांत्वन

**देवणी, दि.२७ एप्रिल -**

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांच्या पत्नी कै. लताबाई गोविंदराव बिरादार (भोपणीकर) यांचे निधन झाले. त्याबद्दल भोपणीकर परिवाराचे सांत्वन करण्यासाठी लातूर काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रा.बी.व्ही. मोतीपवळे यांनी भोपणीकर परिवाराची भेट घेऊन गोविंदराव भोपणीकर, गजानन भोपणीकर यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासोबत प्रमोद लासूने व इतर मान्यवर उपस्थित होते.



### आरी येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

**शिरूर अनंतपाळ, दि.२७ एप्रिल -**

तालुक्यातील आरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी आरी येथील शासकीय जागेवर ध्वज रोवल्या कारणांमुळे तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाला होता. या बाबतीत शिरूर अनंतपाळ पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी नायब तहसीलदार यादव तसेच राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, विशाल गायकवाड, सुमितीनंदन दुरूगकर, तलाठी रामलिंग पाटील, कांबळे यांच्या उपस्थितीत शांतता कमिटीची बैठक घेऊन निर्माण झालेला वाद गावकरी यांच्या उपस्थितीत समन्वयाने मिटवून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आव्हान पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी केले. यावेळी उपसरपंच पवार, पोलिस पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## निलंगा आगारास नवीन बसेस द्या : अभय साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ एप्रिल -**

येथील आगारात सध्या ७० ते ८० बसेस आहेत. यापैकी बहुसंख्य बसेस या जुन्या झालेल्या असून कांही बसेस तर चालविण्या योग्य राहिल्या नाहीत. त्या केवळ भंगारात काढण्याच्या परिस्थितीत आहेत. नुकतेच निलंगा येथील श्री विभुते यांनी विवाह सोहळ्यासाठी बस करारावर बुक करून घेतली असता ती रस्त्यातच बंद पडली. त्यामुळे त्यांचे १२:३० चे नियोजीत असलेले लग्न दुपारी ०३:०० वाजता लागले. आयुष्यातला महत्वाचा लग्नसोहळा केवळ खराब व नादुरूस्त बस दिल्यामुळे बेरंग झाला.



त्यामुळे तात्काळ निलंगा आगारासाठी नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके यांनी निवेदनाद्वारे परीवहन मंत्र्यांकडे केली आहे.

निवेदनात आगार महामंडळाकडून उदगीर, अहमदपूर व लातूर आगारास नवीन बसेस देण्यात आल्या. निलंगा आगारास गरज असताना नवीन बसेस न देता अन्याय करण्यात आलेला आहे. निलंगा आगार नेहमीच फायद्यातील आगार असून त्या आगारात दररोज निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ तसेच कर्नाटकातून मोठ्या प्रमाणावर प्रवासी येतात. निलंगा तालुक्यातील ग्रामीण भागातून विद्यार्थी व मोठ्या प्रमाणात नागरिक निलंग्याला ये-जा करत असतात.

त्यांना नेहमीच खराब बसेसचा फटका बसत आहे. वाटेत अचानक बस बंद पडत असल्याने कोणी विवाह सोहळ्यासाठी बस बुक करण्यासाठी पुढे येत नाही, अशी दयनिय अवस्था झाली आहे. त्यामुळे निलंगा आगारास प्राधान्याने बसेस मिळणे आवश्यक असताना स्थानिक आमदार व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अन्याय होत आहे.

प्रवाशांची सोय व महामंडळाचा फायदा लक्षात घेता निलंगा आगारास कमीत कमी १० बसेस तात्काळ देण्यात याव्यात, अशी मागणी करत गांभीर्याने दखल घेतली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा अभय साळुंके यांनी निवेदनातून दिला.

## पशु आरोग्यासाठी एकत्रीत प्रयत्नांची गरज : डॉ. अनिल भिकाने



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ एप्रिल -**

पशुंचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी पशुवैद्यक, पशुपालक, संशोधक, पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यकानी एकत्रीतपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन माफसूचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने यानी केले. ते जिव्हाळा ग्रुपच्या वीतने जागतीक पशुवैद्यक दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

ते पुढे म्हणाले पशुधन हे निव्वळ मानवी उपजिवीकेचे साधन नसून दुध अंडी व मांस हे पशुजन्य पदार्थ सुदृढ मानवी आरोग्यसाठी प्रथिनाचा उत्तम स्त्रोत असून अन्न सुरक्षा प्रदान करतात.

या पुढील काळात सुरक्षित अन्न पदार्थ निर्मितीसाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. पशुवैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त डॉ. असगरअलि शेख, डॉ. वसंत गुळवे, डॉ. अशोक दारनुळे, संचालक डॉ. अनिल भिकाने व उदगीरचे विस्तार अधिकारी डॉ. विजय घोणसीकर यांचा शाल व सन्मानचिन्ह देऊन जिव्हाळा ग्रुपचे उपाध्यक्ष अशोकराव बिरादार, सहसचिव नवनाथ पाटील, सोपानराव माने, पांडूरंग बोडके, ज्ञानोबा कोटलवार, चंद्रकांत रोडगे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव डॉ. अशोक दारनुळे, सुत्र संचालन लक्ष्मिकांत बिडवई तर आभार प्रदर्शन विश्वनाथराव बिरादार यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष दशरथ शिंदे व सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. माजी अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर, डॉ. जैद हामजा सह जिव्हाळा ग्रुप मधील सदस्य उपस्थित होते.

## पृथ्वीराज पाटील यांची प्रदेश अध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२७ एप्रिल -**

लातूर जिल्हा देवणी तालुक्यातील गरीब शेतकरी घराण्यातील जन्म घेतलेल्या पृथ्वीराज पाटील उर्फ आनंद जीवने यांची केसरिया हिंदू वाहिनी मुख्य मोर्चाचा सर्वच सेलच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

पृथ्वीराज पाटील आनंद जीवने यांनी सांगितले की, केसरीय हिंदू वाहिनी ही एक गैर-राजकीय संघटना आहे. ज्याचे ३० राज्ये आणि १३ देशांमध्ये पदाधिकारी आहेत. जे संत महात्मा आणि पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण, गोसेवा, रक्तदान, रोटी बँक, महिला सक्षमीकरण, हिंदू मंडळाची स्थापना, गुरुकुलांचे बांधकाम, गोशाळा बांधणे, सनातनला बळकटी देणे गोरगरीब शेतकरी शेतमजूर अंध अपंग बाल विधवाअशी कामे सतत करत असतात.



केसरीया हिंदू वाहिनी ही एक ट्रस्ट म्हणून नोंदणीकृत आहे आणि नीती आयोग, एमएसएमई मंत्रालय, बुद्धिमत्ता, मानवाधिकार, पर्यावरण, आरोग्य मंत्रालय तसेच आयकर विभाग यासह अनेक मंत्रालयांनी प्रमाणित केली आहे. केसरीया हिंदू वाहिनीला पूर्ण आयकर सूट आहे. यासोबतच केसरीया हिंदू वाहिनी कुटुंबाला लंडनच्या इंडिया ग्लोरी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. केशरिया हिंदू वाहिनीचे संस्थापक, अतुल मिश्रा यांना यांच्या मार्गदर्शना अतुल मिश्रा यांची निवड करण्यात आली आहे.

## उमरगा (हा.) येथील पाणीटंचाईचा तहसीलदार, गट विकास अधिकाऱ्यांकडून आढावा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ एप्रिल -**

निलंगा तालुक्यातील उमरगा (हा.) येथील पाणी पुरवठ्याबाबत तहसीलदार प्रसाद कुलकर्णी आणि गट विकास अधिकारी सोपान अकेले यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी गावातील पाणीपुरवठ्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. निलंगा महसूल मंडळ अधिकारी आणि उमरगा (हा.) येथील तलाठी यावेळी उपस्थित होते.



उमरगा (हा.) येथे सुरू असलेल्या जल जीवन मिशनच्या कामाची तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी पाहणी करून माहिती घेतली. हे काम पुढील चार ते पाच दिवसांत पूर्ण होईल, असे संबंधित ठेकेदाराने सांगितले. गावातील सार्वजनिक विहीर आणि विंधनविहिरीतील पाणी पुढील काही दिवस पुरेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

पाणीटंचाईच्या समस्येवर उपाय म्हणून बोअर किंवा विहीर अधिग्रहण अथवा टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी प्रस्ताव पाठवण्याबाबत संबंधितांना मार्गदर्शन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी दिली.

## आईबाप हेच सर्वस्व; त्यांची मान खाली घालवू नका : वसंत हंकारे

### ▶▶ सदगुरु विरूपाक्षेश्वर शताब्दी पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२७ एप्रिल -**

आईबाप हेच आपले सर्वस्व असून त्यांना माना खाली घालाव्या लागतील असे वागू नका असे भावनिक आवाहन उपस्थित तरूण-तरूणींना वसंत हंकारे यांनी केले.

तालुक्यातील औराद शहाजनी येथील सदगुरु श्री विरुपाक्षेश्वर महास्वामी यांच्या शंभराव्या पुण्यतिथी निमित्त शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात 'न समजलेले आई-बाप' या विषयावर डॉ. वसंत हंकारे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश बगदुरे, शताब्दी सोहळा समितीचे अध्यक्ष वीरूपक्षय्या शंकद, वीरशैव लिंगायत मंडळाचे अध्यक्ष नागनाथ काडोदे व औराद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल दूरपडे उपस्थित होते. सदगुरु विरूपाक्षेश्वर व भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सध्याच्या समाजातील तरुण-तरुणींच्या चुकीच्या वर्तनावर डॉ. हंकारे यांनी आपल्या भावनिक बोलण्यातून प्रहार केला. तरुणांना वाईट व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. तरूणींनी आपल्या आईबापाचा विचार करून वागावे, वासनेच्या भावनेतून केलेल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकून आपल्या व कुटुंबाच्या आयुष्याचे वाटोळे करू नये. तरूणांचे हे शिकण्याचे वय असून शिक्षणाचे व्यसन लावून घेतले पाहिजे असेही ते म्हणाले. त्यांनी तरूण-तरूणींचे



सामुहिक व भावनिक समुपदेशन करून उपस्थितांची मने जिंकली आणि आई-बापाबद्दल तरूणांच्या मनात संस्काराचे बीज पेरले. याप्रसंगी सपोनि विठ्ठल दुरपडे यांनी त्यांचे दैनंदिन अनुभव सांगून व्याख्यानाच्या विषयाच्या अनुषंगाने समाजप्रबोधनाची आवश्यकता व महत्त्व सांगितले. अध्यक्षीय समारोपात कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश बगदुरे यांनी विविध कवितांच्या माध्यमातून आई-बापाचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले आणि कार्यक्रमाच्या आयोजकांचे कौतुक व अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रदीप पाटील व सूत्रसंचालन डॉ. शंकर कल्याणे यांनी केले. यावेळी औराद व परिसरातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सदगुरु वीरूपाक्षेश्वर शताब्दी पुण्यतिथी सोहळा समितीचे दिलीप कत्ते, शिवकुमार मंडगे, सोमनाथ अंबुलगे, मल्लिकार्जून लातूरे, शिवपुत्र आग्रे व सर्व भक्तांनी कार्य केले.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत ५५ विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२७ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयातील ५५ विद्यार्थी पात्र झाले असून २० विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण घेतले आहेत.

श्रेयस अमोल देशमुख २६४ गुण घेवून विद्यालयातून सर्व प्रथम आला आहे. तर अभिजीत गोविंद चाटे २५० गुण घेवून द्वितीय तर हर्षदा गंगाधर हांडे व आदीश्री सुनीता ताटीपामुलवार या २४६ गुण घेवून तृतीय आलेल्या आहेत. पियुष मुंडे २३८, श्रावस्ती ससाने २३०, सुदर्शन घोगरे २२२, पार्थ बोंडगे २२२, चैतन्य पांचाळ २२२, राजवीर मुंडे २२०, पार्थ किरडे २२०, वलसे युवराज २१८, अल्तमश शेख २१०, वीरा गुदळे २०८, अमृता जवणे २०६, आदित्य झेरीकुंटे २०६, अरिहंत पांचाळ २०६, वैष्णवी ढाकणे २०२, अवधूत नारागडे २००, तेजल आलापुरे २००, आरोही बेंबडे १९८, रितिका सुरवसे १९०, सादिक शेख १८६, पायल उपासे १८२, समरवीर जाधव १८२ सह ५५ विद्यार्थी पात्र झाले आहेत. मिळालेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थाध्यक्ष गणेश हाके पाटील, संस्था सचिव प्राचार्या रेखा तरडे हाके, उपाध्यक्षा ॲड. मानसी हाके, प्राथमिक मुख्याध्यापिका आशा रोडगे, माध्यमिक मुख्याध्यापिका मीना तोवर सह सर्व पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## कडूबाई खरात यांच्या भिम बुद्ध गायनाने रसिक मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२७ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने येथील सम्राट मित्र मंडळ या सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या महाराष्ट्राच्या महागायिका कडूबाई खरात यांच्या बुद्ध भीम गीतांनी अहमदपूर व परिसरातील रसिक मंत्रमुग्ध झाले.

येथील सम्राट मित्र मंडळ व बौद्ध नगर मित्र परिवाराच्या वतीने कडूबाई खरात यांच्या संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून पूज्य भंते महाविरो थेरो यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी मंत्री विनायकराव पाटील, ज्येष्ठ नेते गणेश हाके पाटील, गोपीनाथराव जोंधळे, सागर खर्डे, मुख्याधिकारी संतोष लोमटे, राठोड, सरस्वती कांबळे, डॉ.ओ.एल. किनगावकर, शेषेराव ससाने, सोमेश्व कदम, परमेश्वर घोगरे आदींची उपस्थिती होती.

सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक च्या ठिकाणी सर्व उपस्थित सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पंचशील त्रिशरण भंते महाविरो थेरो यांनी दिले.

यानंतर मंचावर मान्यवरांचा यथोचित सत्कार संपन्न करण्यात आला. त्यानंतर संगीत रजनी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कडूबाई खरात यांनी 'हे खरंच आहे खरं, बाबासाहेब आंबेडकर नांव हे नाव गाजते हो जगभर' या गीताने त्यांनी या कार्यक्रमाची सुरुवात केली. पूढे 'लय मजबूत पावर हाय, माझ्या भिमाच्या नावात', 'माझ्या भिमानं सोन्याने भरली ओटी', 'आम्ही खातो त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रे', 'भीमा भिमा तूच आमची शान रे' अशा एक से बढकर एक बुद्ध भीम गीतांनी कडूबाई खरात यांनी अहमदपूरकरांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे सचिव युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी करून अहमदपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी अडथळ्याची शर्यत कशी पार केली याचा संपूर्ण इतिहास समाज बांधवासमोर ठेवला. तर बब्रुवान खंदाडे, माजी मंत्री विनायकराव पाटील, गणेश हाके-पाटील आदींनी शुभेच्छा भर मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी व मारुती बुद्रुक पाटील यांनी केले तर आभार प्रशांत जाभाडे यांनी मांडले.

## उदगीरात पहलगाम येथे पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ एप्रिल -**

पहलगाम जम्मू कश्मीर येथे पर्यकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ उदगीर येथील विश्व हिंदू परिषद, बजरंगदल भाजपा, उभाटा, शिवसेना व सर्व हिंदुत्वादी संघटना, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नरेंद्राचार्य महाराज सत्संग भक्तागण,व्यापारी व सकल हिंदू समाजाच्या वतीने दि.२५ एप्रिल रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक उदगीर येथे पकिस्थान व दहशवादी हल्ल्या विरोधात निषेध व्यक्त करण्यात आला. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलच्यावतीने दहशवादी पुतळा दहन करून निषेध करण्यात आला.

या निषेध मोर्चात विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष महादेव घोणे, मंत्री श्रीपाद करंगीकर, सहमंत्री आनंद महासुणी, जिल्हा सहमंत्री सचिन जळकोटे, उद्धव हेबतपूरे महाराज, रोहित बाईनवाड, बजरंग दल सहसंयोजक अनिकेत कोळी, सिद्धु भिंगेशिवम हिबाने, प्रशांत घंटेवाड, संदेश दापके, प्रसाद स्वामी, करण बुर्ले, आनंद बुर्ले गनेश कन्नाडे, नागेश कंचे, ओमकार बिरादार, विश्वनाथ गायकवाड, दिनेश देशमुख, श्रीराम प्रतिष्ठाणचे अध्यक्ष सतिश पाटील, ॲड. शिवाजी बिरादार, भाजयाचे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, माजी जिप अध्यक्ष राहूल केंद्रे, शहर अध्यक्ष अलेल अनकल्ले, ग्रामीणचे अध्यक्ष सुनील सावळे, रामदास बेबंडे, पप्पू गायकवाड, गणेश गायकवाड, बालाजी गवारे, रामेश्वर चांडेश्वर, कृष्णाजी भंडे, धनाजी पाटील, दत्ता गुरळे, राम पेद्दावाड आदी उपस्थित होते.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २७ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# दहशतवाद विरुद्धच्या लढाईत एकजूट व्हा : पंतप्रधान

नवी दिल्ली: पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा सर्वच स्तरातून निषेध होत आहे. या हल्ल्यामध्ये २५ पर्यटक आणि एका काश्मिरी तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला, ज्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळत आहे. त्यामुळे या काळात देशाला एकजूट राहण्याचे आवाहन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' यामधून केले.

'मन की बात' या मासिक रेडिओ कार्यक्रमात देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम हल्ल्याबद्दल वक्तव्य केलं. ते म्हणाले की पहलगाम हल्ला दहशतवाद्यांच्या प्रमुखांचा कमकुवतपणा आणि भ्याडपणा दर्शवितो. काश्मीरमध्ये शांतता परत येत होती. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये चैतन्य होते, काश्मीरच्या विकास कामांमध्ये अभूतपूर्व गती निर्माण झाली होती, यामुळे लोकशाही मजबूत होत होती, पर्यटकांच्या संख्येत विक्रमी वाढ होत होती, त्यामुळे उत्पन्न वाढत होते आणि तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत होत्या. देशाच्या शत्रूंना हे आवडले नाही, असे ते म्हणाले.

काश्मीर नष्ट करू इच्छिणाऱ्यांचा खात्मा करू


पंतप्रधान म्हणाले की, संपूर्ण जग भारतासोबत आहे. मी शोकाकुल कुटुंबांना खात्री देतो की त्यांना न्याय मिळेल. दहशतवाद्यांनी आणि त्यांच्या प्रमुखांनी हे कट रचले कारण ते काश्मीर नष्ट करू इच्छितात, पण असे कधीच होणार नाही, कारण या हल्ल्यामागील प्रत्येक व्यक्तीला कठोरातली कठोर शिक्षा होईल. असेआश्वासन त्यांनी दिले.

दहशतवादाविरुद्धच्या युद्धात भारतीयांची एकता महत्वाची

जनतेला संबोधित करताना पंतप्रधान यांनी सामान्य जनतेला एकजूट होण्याचा सल्ला देतात. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात १४० कोटी भारतीयांची एकता ही सर्वात मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक युद्धाचा आधार आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी आपल्याला आपले आदर्श बळकट करावे लागतील. एक राष्ट्र म्हणून आपल्याला आपली इच्छाशक्ती दाखवावी लागेल. असा संदेश त्यांनी दिला २२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन येथे झालेला हा दहशतवादी हल्ला काश्मीर खोऱ्यातील आतापर्यंतच्या सर्वात भयानक दहशतवादी हल्ल्यांपैकी एक मानला जात आहे.

यापूर्वी, बिहार येथील सभेत मोदी यांनी या हल्ल्याचा निषेध केला होता. ज्या दहशतवाद्यांनी आणि ज्यांनी हा हल्ला केला त्यांना अशी शिक्षा मिळेल ज्याची ते कल्पनाही करू शकत नाहीत.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः १०३ सामाजिककार्य

समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात काम करणारी रा. स्व. संघ ही संघटना आहे. राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी संघ धावून जातो. ठ्ड्ड च्या सामाजिक कार्यात राष्ट्रहिताची भावना असते. उदाहरणार्थ १९७७ च्या आंध्र प्रदेश मधील चक्रीवादळाच्या वेळी संघाने भारतभरातून धन एकत्र करून त्यांना विविध रूपात मदत केली. १९८४ च्या भोपाळ गॅस त्रासदीच्या वेळी पीडित परिवारांना मेडिकल हेल्प दिली. २००१ च्या गुजरात भूकंपात संघाची स्वतःची उपचार केंद्रे होती. २००४ च्या सुनामी च्या वेळेस १५० गावांना मदत पोहोचवली. २००६ च्या सुरत महापुराच्या वेळी जरुरी सामान पोचवले. २०१३ च्या उत्तराखंड महापुरात एकट्या संघाची १० कार्यालय होती व तिथे हजारो कार्यकर्ते मदत करत होते. २०१६ च्या बिहार पूरा मध्ये ११००० संघ कार्यकर्त्यांचा सहायता विभाग काम करत होता. २०१७ चा गुजरात महापूर, २०१८चा केरळ महापूर अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. क्रमशः


लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती





# इनकोर कंपनीच्या आगीत कामगाराचा मृत्यू

## मृतावर उशिरा अंत्यसंस्कार

तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- पैठण एमआयडीसीतील औषध निर्माण करणारी इनकोर हेल्द केअर या कंपनीत शनिवारी आग लागुन कामगार रामदास जगन्नाथ बडसल वय ५५ वर्ष रा. पाचलगांव यांचा गुदमरून मृत्यू झाला होता.यासाठी मृताच्या नातेवाईकांनी बडसल यांच्या परिवारातील एका व्यक्तीला कंपनीत कामाला घ्यावी अशी मागणी केली असता कंपनी व्यवस्थापन यांनी उशीरा पर्यत निर्णय घेण्यास विलंब केल्याने गेल्या २४ तासांपासून कामगारांचा मृतदेह हा पैठणच्या शासकीय रुग्णालयात पडून होता.शेवटी पोलिसांनी मायताचे नातेवाईक तसेच कंपनी व्यवस्थापण यांच्यात समेट घालून मार्ग काढला यानंतर मृतावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



तास एमआयडीसी मधील औषध निर्माण करणारी इनकोर हेल्द केअर या कंपनी मध्ये दि.२६ शनिवार रोजी दुपारी २:४५ वाजेच्या सुमारास कंपनीच्या वरील भागात असलेल्या सर्विस प्लोअर विभागात शॉर्टसर्किटमुळे अचानक लागलेल्या आगीमुळे एक कामगाराचा आगीच्या धुरामध्ये गुदमरून मृत्यू झाला तर दोन जखमी दोन कामगार जखमी झाले होते. रामदास जगन्नाथ बडसल वय ५५ रा.पाचलगांव पैठण असे या मयत कामगाराचे नाव होते.

या बाबत अधिक माहिती अशी, पैठण एमआयडीसी मधील ईनकोर हेल्थ केअर कंपनी असून या कंपनीमध्ये औषधी उत्पादन निर्माण केले जातात या ठिकाणी शनिवार रोजी दुपारी २:४५ वाजेच्या सुमारास कंपनीच्या वरील भागात असलेल्या सर्विस प्लोअर विभागात शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागल्यामुळे कंपनीत मोठ्या प्रमाणात आगेचे धुर बाहेर येत होते. हे आगीचे धुर नेमके कशाचे येते असल्याचे बघण्यासाठी कंपनीतील तांत्रिक विभागाचे कामगार रामदास बडसल , रामदास बोंबले रा.पाचलगाव ता.पैठण व सारंगधर गव्हाड रा . छत्रपती संभाजीनगर हे गेले असता आगीच्या धुरामध्ये हे तीघे आतमध्ये गुंतले . कंपनी प्रशासनास या आगीची माहिती



मिळताच त्यांनी अग्निशमन दलास पाचारण केले. घटनास्थळी तीन अग्निशमन दल , टँकर दाखल होत आग लागलेल्या ठिकाणी असलेले दोन कामगारांना जखमी अवस्थेत बाहेर काढले पंरूतु आगीमुळे धुर खोलीत पसरल्याने रामदास बडसल हे सापडले नाही. साडेतीन तासांच्या प्रयत्नानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी सर्विस प्लोअर विभागाच्या वरील पत्रे काढून रामदास बडसल यांना बेशुद्ध अवस्थेत बाहेर काढत पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासून मयत घोषित केले होते. बडसल हे कंपनीत पर्मनंट कामगार असल्यानें त्यांच्या नातेवाईकांनी परिवारातील एका व्यक्तीला कंपनीत कामावर घेण्याची मागणी केली आहे.

# आयपीएलच्या सुरक्षेत वाढ

मुंबई : पहलगाम हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढतच चालला आहे. अशातच आता भारतात सुरू असलेल्या आयपीएल २०२५ टुर्नामेंटची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. सध्या आयपीएलचा १८ वा हंगाम सुरू आहे. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून प्रेक्षक आणि खेळाडूंच्या सुरक्षेसाठी स्वदेशी अँटी ड्रोन सिस्टिम कार्यान्वीत करण्यात आली आहे.

बिग बँग सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडने (बीबीबीएस) शनिवारी (दि.२६) देशभरात जिथे इंडियन प्रीमियर लिगचे सामने खेळण्यात येत आहे, तिथे स्वदेशी अँटी ड्रोन सिस्टिम कार्यान्वीत केली आहे.त्याचसोबत वज्र सुपर शॉट सुद्धा तैनात करण्याची घोषणा करण्यात आली आहे. वज्र सुपर शॉट हे एक हलके, हातात धरण्याजोगे अँटी ड्रोन शस्त्र आहे. ते ४ किलोमीटर दूरपर्यंतच्या ड्रोनचा लागलीच शोध घेते आणि शत्रूच्या ड्रोन कम्युनिकेशन सिग्नल तोडते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा धोका नसतो.

बीबीबीएसने जारी केलेल्या पत्रकानुसार, ही प्रणाली पोर्टेबिलिटी आणि अनुकूल फ्रिक्वेन्सी जॅमिंगसह समोरच्या शस्त्राला प्रभावित करते. राष्ट्रीय सुरक्षा आणि स्वदेशी रक्षा प्रणाली विकसीत करण्यासाठी बीबीबीएस नेहमी तत्पर असल्याचे कंपनीने म्हटले आहे. जर स्टेडियमच्या जवळपास एखादे फ्लाईंग ऑब्जेक्ट, ड्रोन वा इतर एखादी यंत्रणा आकाशात दिसली तर हे अँटी ड्रोन सिस्टिम त्याचे कम्युनिकेशन सिग्नल डॅमेज करते. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेला बाधा येत नाही.





तुमची पल्सर निवडा आणि ट्राइबमध्ये सामील व्हा डाउन-पेमेंट सुरू ₹5 370/-*

| | 125 NEON | NS125 BASE | NS160 BASE | NS200 BASE |
|---|---|---|---|---|
| बचत | - | - | ₹9 075/- | ₹8 448/- |
| खास किंमत (बचत झाल्यावर) | ₹86 278/- | ₹99 994/- | ₹1 30 355/- | ₹1 40 307/- |

*एक्स-शोरूम क्रीमत

pulsar DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | BAJAJ CREDIT

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स-शोरुम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स-शोरुम किंमत 31 मार्च 2025 नुसार. *पल्सर 125 निऑनसाठी डाऊन-पेमेंट म्हणजे मार्जिन मनी. मार्जिन मनीमध्ये DCC शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत आणि ते क्रेडिट पॅरामीटर्सच्या पूर्ततेवर आधारित आहे. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 7276183895**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# ऐका, पुढल्या हाका...

कोणताही सिद्धान्त सिद्ध होण्यासाठी एक अट असते. 'इतर परिस्थिती सामान्य असेल तर'... ही ती अट! म्हणजे, सारे काही सुरळीत, जगरहाटीनुसार सुरू असेल, तरच कोणत्याही शास्त्राचे सिद्धान्त खरे ठरतात. कारण असे सिद्धान्त हे पूर्वानुभवाच्या आणि वर्तमानातील सुरळीत स्थितीच्या आधारावरच मांडले जात असतात. म्हणजे, अघटित किंवा अनपेक्षित परिस्थितीत प्रस्थापित सिद्धान्त सार्थ ठरत नाहीत. म्हणूनच, जागतिक लोकसंख्यावाढीच्या आजवरच्या गणिती सिद्धान्तांच्या आधारावर येत्या काही दशकांत मांडले जाणारे किंवा याआधी मांडले गेलेले भविष्यातील लोकसंख्येचे आकडे किती खरे ठरतील, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. जागतिक लोकसंख्यावाढीचा गेल्या दोन हजार वर्षांचा किंवा त्याआधीचा इतिहास, गेल्या काही दशकांमध्ये त्यामध्ये होणारे चढउतार आणि त्यांच्या आधारावर वर्तविण्यात आलेली जगाच्या लोकसंख्येची आगामी भाकिते लक्षात घेतली, तर आज ८२१ कोटींच्या घरात असलेल्या जगाच्या लोकसंख्येने येत्या तीस वर्षांत, २०५० पर्यंत, एक हजार कोटींचा आकडा पार केलेला असेल. तीन-चार वर्षांपूर्वी चीन हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश होता. भारताने आता चीनला मागे टाकले असून, जगाच्या लोकसंख्येपैकी तब्बल १७ टक्क्यांहून अधिक टक्के म्हणजे १४६ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेला भारत हा पहिल्या क्रमांकाची लोकसंख्या असलेला देश आहे. चीनची आजची लोकसंख्या १४१ कोटींच्या आसपास आहे आणि जगातील अन्य प्रगत, अप्रगत देश लोकसंख्येनुसार या दोन देशांच्या तुलनेत कितीतरी मागे आहेत. आजवरच्या भारताचा लोकसंख्यावाढीच्या संख्याशास्त्रानुसार, लोकसंख्यावाढीचा आजवरचा वेग येत्या काही दशकांत मंदावणार असला तरी, सन २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १६९ कोटींवर पोहोचलेली असेल आणि चीनची लोकसंख्या १२६ कोटींपर्यंत खाली आलेली असेल. आज भारतात दर चौरस किलोमीटर क्षेत्रात ४९२ लोकसंख्या राहते. येत्या तीस वर्षांत लोकसंख्यावाढीमुळे ही दाटी अधिकच गडद होणार असून, २०५० मध्ये लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरमागे ५६५ इतकी असेल व त्यापैकी ५२.२० टक्के घनता शहरी भागांत एकवटलेली असेल असा अंदाज वर्तविला जात आहे. शहरांतील दाटी अधिक वाढलेली असेल आणि त्यामुळे साािजकच सुविधांवर पडणारा ताण सामाजिक किंवा कौटुंबिक अस्वस्थता वाढविणारा ठरू शकेल, असा याचा स्पष्ट अर्थ आहे.

जागतिक पातळीवरील विविध क्षेत्रांचा संख्याशास्त्रीय अभ्यास करणाऱ्या संशोधकांच्या वर्ल्डओमीटर नावाच्या अमेरिकेतील एका आंतरराष्ट्रीय समूहाकडून लोकसंख्येचा जवळपास प्रत्येक क्षणाचा तपशील गोळा केला जातो. या समूहाच्या नोंदीनुसार, ख्रिस्तपूर्व आठ हजार साली जेमतेम ५० लाख लोकसंख्या असलेल्या मानवजातीस शेतीचे तंत्र अवगत होत गेले आणि लोकसंख्यावाढीचा वेग वाढत गेला. पहिल्या इसवी सनात २० कोटींपर्यंत लोकसंख्या असलेल्या जगातील मानवजातीच्या प्रगतीचा वेग आणि लोकसंख्यावाढीचा वेग जवळपास सारखाच राहिला. सन १८०० मध्ये १०० कोटींचा टप्पा गाठला गेला आणि पुढे १९३० पर्यंतच्या जेमतेम १३० वर्षांत लोकसंख्येने दोनशे कोटींची मजल मारली. पुढे केवळ ३० वर्षांतच जगाच्या लोकसंख्येने दुपटीचा टप्पा गाठला आणि नंतर दुपटीकडे झेपावण्याचा कालावधीही कमी होत गेला. १९८७ पर्यंत लोकसंख्येने ५०० कोटींची मजल मारली होती. आता मात्र हा वेग पुन्हा एकदा मंदावत चालला असून जगाच्या आजच्या लोकसंख्येने दुपटीचा, म्हणजे १५५० कोटींचा टप्पा गाठण्यासाठी पुढील २०० वर्षांची वाटचाल करावी लागेल, असा या अभ्यासगटाचा अंदाज आहे.

जगाच्या लोकसंख्येच्या तुलनेत पहिल्या क्रमांकाचा देश असलेल्या चीनची पाच वर्षांपूर्वीची लोकसंख्या १४३.८६ कोटी इतकी होती. मात्र, या आलेखाची दिशी उलट्या बाजूला करून लोकसंख्यावाढीचा वेग उणे करण्यावर चीनचा भर असल्याने, आज या देशाची लोकसंख्या कमी होऊन १४१ कोटींवर स्थिरावली आहे, आणि २०५० पर्यंत तेथील लोकसंख्या दर वर्षी ९१ लाखांनी कमी होऊन १४० कोटींवर स्थिरावलेली असेल असा वर्ल्डओमीटर गटाचा अंदाज आहे. भारत आणि चीन या पहिल्या रांगेतील दोन देशांची तुलना केली, तर भारताच्या लोकसंख्यावाढीचे भविष्य काहीसे भयावह वाटावे असे असेल. आज दर चौरस किलोमीटरमध्ये ४६४ एवढी लोकसंख्येची घनता असलेल्या भारतात जेव्हा ही गर्दी आणखी वाढेल, तेव्हा चीनकडील घनता मात्र, दर चौरस किलोमीटरमागे १५१ वरून ७० पर्यंत कमी झालेली असेल. परिस्थिती सामान्य राहिली, तर भविष्यातील भारताचे हे गर्दीचे चित्र आनंददायी असेल, की भयप्रद असेल याचा विचार करण्यासाठी या अभ्यास गटाचे हे संशोधन नक्कीच उपयोगी आहे. कारण, भारताची लोकसंख्या हे संकट आहे, असे मानणारा एक वर्ग आहेच आणि हे संकट नसून संधी आहे असे राज्यकर्त्यांना वाटते. आज भारत हा जगातील एक कुशल मनुष्यबळ असलेला आणि क्षमतावान तरुणांची संख्या अधिक असलेला देश आहे आणि अशी संपत्ती अन्य देशांकडे नसल्याने या संधीचे सोने करण्यासाठी भारताच्या तरुणांनी ज्ञानसंपन्न आणि आरोग्यसंपन्न असावयास हवे, यावर सरकारचा भरदेखील आहे. त्यासाठी सरकारी स्तरावर तरुणांच्या क्षमतांना प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजनादेखील राबविल्या जात असल्याने भविष्यकाळाचे सोने घडवायचे की लोकसंख्येच्या विस्फोटात हा काळ होरपळू द्यायचा हेदेखील आताच ठरविणे गरजेचे आहे. अलिकडे लोकसंख्येच्या संदर्भात भारतास भेडसावू पाहणारी आणखी एक नवी समस्या डोके वर



काढू लागली असून, लोकसंख्यावाढीच्या वेगाचा आलेख उतरू लागल्यावर लोकसंख्येमध्ये वयोवृद्धांची भर पडत गेल्यास नवे प्रश्न निर्माण होतील अशी भीती आता भेडसावू लागली आहे. गेल्या १७ तारखेस देशाच्या सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अरविंद पानगडिया यांनी एका पत्रकार परिषदेत या भयाचे संकेत दिले. दक्षिणेकडील राज्यांमध्ये जन्मदराचा आलेख सातत्याने खालावत चालला असून भविष्यात वृद्धत्वामुळे परावलंबित्वाकडे झुकणाऱ्या पिढीची लोकसंख्या वाढेल, असे पानगडिया यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले. केवळ आंध्र प्रदेशच नव्हे तर आसाम आणि तामिळनाडूच्या भविष्यातील लोकसंख्येतही वयोवृद्धांचाच भरणा असेल, असेही ते म्हणतात. त्यामुळे, आज ज्या तरुणाईकडे राष्ट्राची सर्वाधिक क्षमतावान साधनसंपत्ती म्हणून पाहिले जात असले, तरी भविष्यातील वास्तव वर्तमानापासून बरेच दूरचे देखील असेल याची जाणीव आता होऊ लागली आहे. आयुर्मान वाढल्यामुळे भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान ७२.५ वर्षे आहे. तीन वर्षांपूर्वी, २०२२ मध्ये साठ वर्षे वयोमानापुढील व्यक्तींची लोकसंख्या सुमारे १५ कोटी (एकूण लोकसंख्येच्या सुमारे १०.५ टक्के) एवढी होती. येत्या २५ वर्षांत, २०५० पर्यंत ही लोकसंख्या सुमारे ३५ कोटींच्या घरात पोहोचलेली असेल असा अंदाज आहे. त्याआधीच्या पाच वर्षांत, २०४५ पर्यंत साठी ओलांडलेल्यांची संख्या पंधरा वर्षांखालील वयाच्या लोकसंख्येहून अधिक झालेली असेल, असेही अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. या वाढीचा वेग ४१ टक्क्यांहून अधिक असेल आणि वयाची ८० वर्षे पार केलेल्या लोकसंख्येच्या वाढीचा वेग तर पुढील २५ वर्षांत २५० टक्क्यांच्या घरात असेल व यामध्ये महिलांची संख्या अधिक असेल, असाही अंदाज वर्तविला जात आहे. यापैकी बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागांत, जेथे अद्ययावत आरोग्य सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतील अशा ठिकाणी असेल, त्यामुळे नव्या समस्याही निर्माण होऊ शकतात, असा अन्य काही पाहणी अहवालांचा निष्कर्ष आहे. यातही आणखी एका समस्येची मुळे दडलेली आहेत. अशा वयोगटातील जवळपास १८ टक्के लोकसंख्या गरिबीशी झगडणारी किंवा अल्प उत्पन्नानिशी उपजीविका करणारी असेल, त्यामुळे साहजिकच, हा संघर्ष सोपा नाही. अर्थातच, ते भविष्यातील भारतासमोरचे मोठे आव्हानही ठरणार आहे.

उत्तरेकडील राज्यांच्या तुलनेत आजही केरळ, तामिळनाडूसारख्या राज्यांत वयोवृद्धांची संख्या अधिक आहे. केरळमध्ये जवळपास १७ टक्के लोकसंख्या वयाची साठी ओलांडलेली आहे, तर तामिळनाडूत सुमारे १४ टक्के लोकसंख्या याच वयोगटातील आहे. त्यामुळे, आज ज्या योजना तरुणांसाठी महत्त्वाकांक्षी भावनेतून आखल्या व राबविल्या जात आहेत, त्यांची भविष्यातील दिशा बदलेल व वयोवृद्धांकरिता आरोग्य सुविधा, विशेष साह्य योजना, वय वंदना योजना आदी योजनांकरिता अधिक आर्थिक तरतूद अपरिहार्य ठरेल. यापैकी काही योजना आजही राबविल्या जात आहेत, भविष्यात त्यासाठी भरीव तरतूद करावी लागेल व अर्थव्यवस्थेचा मोठा हिस्सा वयोवृद्धांच्या देखभालीकरिता बाजूला ठेवावा लागेल.

वाढती लोकसंख्या ही संधी की संकट याची उत्तरे काहीशी स्थितिसापेक्षच असतात. एका बाजूला वाढती लोकसंख्या ही समस्या मानली जात असली, तरी काही अंशी लोकसंख्येची शक्ती ही संधीमध्येही परिवर्तित करता येते, असे सरकार मानते. वाढत्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक तसेच भौतिक संसाधनांवर ताण येतो, अन्न, पाणी निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी अगोदरच यंत्रणांवर प्रचंड दबाव आहे. शहरीकरणामुळे पायाभूत सुविधा कितीही विस्तारल्या तरी लोकसंख्येचा आलेख उंचावत असल्याने त्या अपुऱ्या ठरत आहेत. वाढत्या लोकसंख्येसोबत कौटुंबिक गरजादेखील वाढणार असून त्या भागविण्यासाठी पुरेशा ठरतील अशा रोजगारांच्या नव्या संधी निर्माण करण्याचे आव्हानही पेलावे लागणार आहे. गरजेनुसार या संधींची पूर्तता झाली नाही, तर अकुशल कामगारांची संख्या वाढून आर्थिक विषमतेची दरी अधिक रुंदावण्याचीही भीती असते. या समस्येसोबत काही नैसर्गिक बाबींकडे दुर्लक्ष करणेही गरजेचे ठरेल. काही गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीवरील आक्रमणे वाढतील. आजमितीस जगभर वर्षागणिक सुमारे १६ लाख हेक्टर भूभागावरील जंगले नष्ट होत आहेत, तर २० लाख हेक्टरहून अधिक जमिनीची दरवर्षी धूप होत आहे. सुमारे ३१ लाख टन रासायनिक द्रव्ये पर्यावरणात जमा होत आहेत आणि जगण्याची पुरेशी संसाधने उपलब्ध होत नसल्याने जगभर दिवसाकाठी सुमारे २५ हजार लोकांचा उपासमारीने मृत्यू होत आहे. प्रदूषित पाण्यामुळे जगातील अनेक देशांतील मृत्यूंचा आकडा वाढत आहे, तर जगभरातील ७५ कोटींहून अधिक लोकसंख्येस पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणीदेखील मिळत नाही. अभावग्रस्ततेच्या या वेगाचा विचार केला, तर येत्या काही दशकांत अनेक नैसर्गिक संसाधनांचा पूर्ण अभाव निर्माण होईल आणि नैसर्गिक संसाधने ओरबाडण्याच्या अपरिहार्यतेपोटी स्पर्धा वाढून अशांतताही वाढीला लागेल. जंगलतोड वाढेल, प्रदूषणाच्या समस्या तीव्र होतील आणि पर्यावरणाचे प्रश्न उग्र होतील. प्रदूषण आणि हवामान बदलासारख्या समस्या तर आताच भेडसावू लागल्या असून भविष्यात त्यावरील उपाययोजना तोकड्या पडून नैसर्गिक साधनसंपत्तीचा दुष्काळही भेडसावेल अशी भीती व्यक्त होत आहे.

मात्र, लोकसंख्या ही संधी मानणाऱ्या वर्गाकडून त्यासाठी काही ठोस कारणेदेखील दिली जातात. योग्य शिक्षण आणि कौशल्य विकासातून रोजगाराच्या सर्व संधींचे सोने करणे शक्य आहे, असा या वर्गाचा विश्वास आहे. ही लोकसंख्याच अर्थव्यवस्थेस गती देऊ शकते आणि या लोकसंख्येकडे बाजारपेठेस प्रोत्साहन देण्याचीही क्षमता असते. त्यामुळे स्टार्टअप, तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रास याचा मोठा फायदा घेता येईल, असा दावा केला जातो. तरुण लोकसंख्येची क्षमता ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्जनशीलतेस व त्याद्वारे उभ्या राहणाऱ्या उद्योगांना चालना देऊ शकते, हे सध्याच्या जागतिक रोजगाराच्या बाजारपेठांतील भारतीय तरुणांच्या मागणीवरून सिद्ध झाले आहे. भारताचे कुशल कामगार जागतिक बाजारपेठांमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहेत. माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रांतील भारताच्या ज्ञानाची योग्यता जगाने जाणली आहे. त्यामुळे, शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करून योग्य धोरणे राबविली गेली, तर हीच लोकसंख्या आर्थिक प्रगती आणि जागतिक नेतृत्वासाठी नव्या संधींची निर्मिती करणारी ठरू शकेल. शाश्वत विकास, कौशल्यवृद्धी आणि समावेशक धोरणांच्या आखणीतून संभाव्य संकटाचे रूपांतर उत्पादक संधींमध्ये करणे अशक्य नसल्याने भारताची भविष्यातील वाटचाल यापैकी कोणता मार्ग निवडते, यावर संधी आणि संकट यापैकी कोणाही एकाचे भविष्य अवलंबून राहणार आहे. भारताची लोकसंख्या आणखी ५० वर्षांनी, म्हणजे २०७५ साली १.६७ अब्जांचा आकडा गाठेल आणि त्यानंतर मात्र वाढीचा वेग स्थिरावेल, असा लोकसंख्याशास्त्राच्या अभ्यासकांचा अंदाज आहे. या काळातील समस्यांचा मोठा फटका ज्या लोकसंख्येस बसणार आहे, त्यामध्ये वृद्धांचा भरणा अधिक असेल. त्या समस्यांचे त्यांना बसणारे संभाव्य चटके सुसह्य व्हावेत यासाठी धोरणे आखण्याची हीच वेळ आहे. कारण, भविष्यातील हाकारे आता वेगवेगळ्या समस्यांच्या रूपाने समाजात घुमू लागले आहेत. सारे काही सुरळीत असेल, तर काही सिद्धान्तांची सत्यता सिद्ध होत असते. आजच्या स्थितीचा विचार केला, तर भविष्यात सारे काही सुरळीत असेलच याची शक्यताच धूसर असल्याने आव्हाने अधिक तीव्र होतील हे लक्षात घ्यायलाच हवे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### शिदोरीने जपला आपुलकीचा गोडवा

शिदोरी म्हटले की आठवते, शेतात कष्ट करीत असलेल्या कारभारीसाठी बायको घरून घेऊन जाते ती शिदोरी. तसे प्रत्येकाच्याच आयुष्यात शिदोरीशी एक अतूट नाते आहे. जुन्या काळातील ग्रामीण घरातून सुती स्वच्छ कापडात भाजी-भाकरी, कांदा-मिरचीचा ठेचा अशी न्याहारी बांधून ही शिदोरी तयार केली जायची. आता त्याला टिफिन बॉक्स म्हणू लागले. काळ बदलला, पण व्यंजनाची लज्जत तीच घरी तयार केलेली ताजी आणि स्वादिष्ट. भूतकाळात डोकावले की शिदोरी या शब्दांशी जुन्या माणसांचे म्हणजेच आपल्या पूर्वजांचे ऋणानुबंध जुळले असल्याचे दिसून येते.



घरात तयार करून सोबत घेऊन जाणारी ही न्याहारी म्हणजेच शिदोरी अशी लहानशी व्याख्या जरी या शिदोरीची असली, तरी या शिदोरीचा अर्थ एवढ्यापर्यंतच सीमित नाही तर ही शिदोरी धार्मिक आणि पारंपरिक संस्कृतीतही तितकीच महत्त्वाची समजली जाते.

विवाहानंतर सासरी पाठवणी करताना नववधूसोबत माहेरहून शिदोरी दिली जाण्याची प्राचीन प्रथा परंपरागत चालत आलेली आहे. जेणेकरून तिला तिच्या सासरी संपूर्ण आयुष्यात धनधान्य संपन्नता मिळत राहावी नववधूला सोबत दिली जाणाऱ्या शिदोरीत माहेरचा असीमित मायेचा स्नेहाचा ठेवाच असतो. पुरणपोळी-सांजोरी, लाडू-अनारसे, करंजी-चकली, शेवया-पापड-कुरडई आणि सौंदर्य प्रसाधने, आभूषणे रुखवंत स्वरूपात ही शिदोरीच तर असते. या पारंपरिक शिदोरीसह संस्काराची शिदोरीही परंपरागत पिढी दर पिढी मिळत जात आहे.

शिदोरी हा शब्द जपानमधून प्रचलित झालेला आहे की काय माहीत नाही, पण धार्मिक भावनेतून जपानी भाविक रेशमी कापड मंदिरात ईश्वराला अर्पण करतात; त्या प्रथेला शिदोरी म्हणतात. भारतीय संस्कृतीत शिदोरीचे विविध प्रकारे महत्त्व आहे. घरात तयार करून भूक भागविण्यास खाद्यपदार्थ जेव्हा लांबच्या प्रवासाला जाताना नेले जातात; ती दोन प्रकारची शिदोरी असते. सुके पदार्थ जसे लाडू-चिवडा, करंजी-चकली तर ओल्या पदार्थांची शिदोरी भाजी-पोळी, मसालेभात-चटण्या वगैरे. घरी स्वतः तयार केलेल्या पदार्थांची लज्जत प्रवासात आपल्या आप्तांसोबत खाण्यास द्विगुणित आनंद देऊन जाते. भारतीय संस्कृतीत घरी येणारे पाहुण्यांची सरबराई केली जातेच; पण ते परतीच्या प्रवासाला निघताना सोबत खाद्यपदार्थांची शिदोरी दिली जाते, वाटेत गैरसोय होऊ नये म्हणून. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात घरी येणाऱ्या पाहुण्यांना स्वतःच्या शेतात पिकणारे धान्य-कडधान्य, भाजी, बगिच्यातील फळे उदार मनाने देतानाचे अनुभव वरचेवर घेत असतो; हीसुद्धा सोबत दिली जाणारी सुकी शिदोरीच असते. पूजा-अर्चना, पारायण, होम हवन करताना आपण घरी आप्तांना प्रसादाला बोलावतो. परत जाताना थोडाथोडका का होईना प्रसादाचा डबा सोबत देतो. आपण गणपती बाप्पाला सोबत देतो ती मोदक-फळे, सुखा-मेवा प्रसाद स्वरूपात प्रतिष्ठापनेपासून तर अगदी विसर्जन करतेवेळीसुद्धा बाप्पाच्या आवडीचे पदार्थ सोबत देतो; ही बाप्पासोबतची शिदोरी धार्मिक संस्कारातून दिलेली असते. शिदोरीचा अर्थ आपण आपल्या भावना व इच्छा व्यक्त करण्यासाठी अर्पण करतो आणि देवाचा आशीर्वाद प्राप्त करण्याचा हा एक मार्ग आहे.

'शिदोरी सार्थ या जीवनी; घडू दे परमार्थाची शिदोरी या जीवनी'

**शीला श्रीकांत पवनीकर**/७२७६६१२५१६

### निमित्त : हिंदीच्या सक्तीचे

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी मराठी भाषक राज्यात पहिलीपासून हिंदी सक्ती केल्याच्या १६ एप्रिलच्या शासन निर्णयास स्थगिती दिली ही समाधानाची बाब आहे. समाधानाची यासाठी म्हणायला हवे की स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय घोषित केल्यानंतर तो अंमलात आणला जाणार नाही, असे मागे शासनाने सांगूनही स्मार्ट मीटर लावण्याचे काम मात्र थांबले नाही, हिंदीबाबतच्या निर्णयाबाबत तसे होऊ नये ही अपेक्षा.

हिंदी भाषेबद्दल शासन इतके आग्रही का असावे तर त्यामागे 'एक भाषा, एक देश' हे सूत्र कारणीभूत आहे. शिवाय या देशात हिंदी ही बहुसंख्यकांची भाषा आहे आणि म्हणूनच ती संपर्क भाषा होऊ शकते असा दावाही शासकीय पातळीवर केला जातो. मात्र हिंदी ही तशी संपर्क भाषा होऊ शकते काय? याचा विचार होणे गरजेचे वाटते. २०११ सालच्या जनगणनेनुसार भारतात ५३.४३ टक्के लोक हिंदी बोलतात. यात खरी गोम अशी आहे की, ज्या हिंदी बहुभाषिकत्वाचा आपण अभिमान बाळगतो अन् म्हणून ती संपर्क भाषा होण्यासाठी आग्रही असतो, त्या हिंदीभाषेत इतर भाषांतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक बोलणाऱ्यांची संख्या आहे. भोजपुरीतील ५ कोटींपेक्षा जास्त लोक हिंदी भाषेत समाविष्ट आहे, तसाच सिनेमा, वाड्मय, वृत्तपत्रे, गाणी, रंगभूमी व इतर प्रकाशने यांचाही अंतर्भाव त्यात आहे. उत्तराखंड, राजस्थान, झारखंड, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश या प्रांतातील अनेक बोली हिंदीत ढकलल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रात बोलली जाणारी पोवारी बोली, जी मध्यप्रदेशाच्या काही भागातही बोलली जाते, त्या भाषकांना आपण हिंदी बोलतो याबद्दल हरकत नाही. मात्र ते स्वतःस हिंदी भाषक म्हणत नाही. त्यामुळे हिंदी बहुसंख्यकांची भाषा आहे, या म्हणण्यात काही अर्थ उरत नाही. निव्वळ हिंदी भाषकांची संख्या ५३.४३ टक्क्यांवरून ३९ टक्क्यांपर्यंत खाली घसरते. ज्या उत्तर भारतीय राज्यांत हिंदी ही बहुसंख्य लोक बोलतात, त्या हिंदी भाषेत इतर भाषांचा समावेश केला नाही तर हिंदीच्या घसरणीचे असे चित्र दिसते. घटनेच्या ८ व्या सूचीत असलेल्या हिंदीचा दर्जा त्या सूचीत असलेल्या २२ भाषा एवढाच आहे. त्यामुळे अहिंदी भाषिक राज्यांवर हिंदीची सक्ती करणे हे अतीच ठरते.

हिंदी ही एक सुंदर भाषा आहे. जगात बोलल्या जाणाऱ्या इतर सर्व लहान मोठ्या भाषांइतकीच ती विलोभनीय आहे. भारतीय सिनेमाला जागतिक प्रसिद्धी देण्याचे आणि त्यातून पैसा मिळवून देण्याचे काम याच भाषेने केले आहे. हिंदी साहित्य अत्यंत श्रीमंत आहे. त्याचा आपल्यास अभिमान आहे. असे सगळे तर आहेच. शिवाय आठव्या सूचीत असलेल्या भाषांच्या तुलनेत ती सर्वांत तरुण भाषा आहे. मराठी भाषा त्यामानाने बरीच वयस्क आहे. अभिजात आहे. हिंदी हळूहळू वाढत असली तरी ती सक्तीची करावी एवढी पण वाढली नाही.

मराठीसारखी समृद्ध व्हायला तिला अजून वेळ द्यायला हवा. या देशाची फेडरल रचना बघता आणि भाषेसारखे संवेदनशील प्रकरण हाताळताना शासकीय भाषा समितीने भारताच्या बहुभाषिक, संस्कृती वैशिष्ट्याकडे लक्ष दिले पाहिजे. महाराष्ट्रात असलेल्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १० कोटी लोक मराठी बोलतात हा मुद्दा आहेच, त्यामुळे महाराष्ट्रात हिंदी सक्तीची करणे ही गोष्ट त्रिभाषा सूत्रात बसत असेलही, तथापि संपर्क भाषेच्या निमित्ताचा हवाला देऊन 'एक देश, एक भाषा' या आवरणाखाली त्याचे उपशमन करता येणार नाही. त्यामुळे राजकीय अजेंडा साध्य करता येईलही कदाचित, पण भारतीय बहुसांस्कृतिकतेच्या वैशिष्ट्याचे काय, ज्यामुळे जगात भारतीय ओळख ठेवून आहेत.

**डॉ. विलास देशपांडे**/९९६००३११४८

### युवा पिढीत राष्ट्रभक्ती जागविण्याची गरज

देशातील आजच्या तरुण पिढीला राष्ट्रभक्ती म्हणजे काय असते? असे विचारले तर स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनाला तिरंगा मिरवणे, तिरंगी कपडे घालून फोटो काढणे, देशभक्तिपर गाण्यावर व्हिडीओ बनविणे व त्याचे फोटो, व्हिडीओ समाज माध्यमावर टाकणे, एखाद्या क्रांतिकारकाच्या जन्मदिनी, पुण्यतिथी दिनी त्याचे अभिवादन करणारे स्टेटस समाज माध्यमावर टाकणे, भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तान विरुद्ध एखादा सामना जिंकल्यास किंवा एखादी क्रिकेट मालिका जिंकल्यास किंवा एखाद्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये एखादे पदक जिंकल्यास त्याचे अभिनंदनाचे स्टेटस समाज माध्यमावर टाकणे म्हणजे राष्ट्रभक्ती. या पलीकडे जास्तीत जास्त भारतीय सैन्यात जाऊन देशाची सेवा करणे म्हणजे राष्ट्रभक्ती होय अशी उत्तरे आपल्याला मिळतात.

आजकालची तरुण पिढी हे विसरली आहे की आपल्या देशाचा हजारो वर्षांचा संघर्षमय इतिहास आहे. अनेक संकटांवर मात करून आज आपला देश ताठ मानेने उभा आहे. आजवर आपल्या देशाच्या रक्षणासाठी अनेक थोरांनी आपले बलिदान दिले आहे. आपल्या जीवावर उदार होऊन अभिमान वाटेल असे राष्ट्र आपल्याला या थोर व्यक्तींनी समर्पित केले आहे. राष्ट्रभक्तीचा ज्वलंत आदर्श स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या रूपाने आजच्या तरुण पिढीसमोर आहे. आपल्या प्राणांची आहुती देऊन कोंढाणा किल्ला मोजक्या मनुष्यबळाच्या जोरावर काबीज करणाऱ्या नरवीर तानाजी मालुसरे, पावनखिंडीत मृत्यू समोर उभा असताना तोफेच्या आवाजाआधी प्राण न सोडणाऱ्या बाजीप्रभू देशपांडे यांचा पराक्रम आजच्या तरुण पिढीने वाचावा, मग कळते खरी राष्ट्रभक्ती काय असते ते. स्वातंत्र्य सूर्याला स्वतःच्या रक्ताचे अर्घ्यदान करून क्रांतीची ज्वाला पेटविणारे मंगल पांडे, चाबकाच्या प्रत्येक फटक्या बरोबर मातृभूमीचा जयजयकार करणारे बटुकेश्वर दत्त, 'योग्य तेच केले खुशाल फाशी द्या' असे म्हणणारे चाफेकर बंधू, 'घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' असे म्हणणारे स्वातंत्र्यवीर सावरकर, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी रणगर्जना करणारे लोकमान्य टिळक आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी अगदी हसत हसत फासावर चढलेल्या भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांसह फाशी गेलेल्या शेकडो क्रांतिकारकांचा, स्वातंत्र्यसंग्रामात मृत्युमुखी पडलेल्या हजारो हुतात्म्यांचा तसेच देशाच्या रक्षणासाठी देशाच्या सीमेवर आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या लाखो सैनिकांचा त्याग आठवल्याशिवाय राष्ट्रभक्तीची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही. आजच्या तरुण पिढीला यांच्या बलिदानातून राष्ट्रभक्तीची शिकवण घेण्याची गरज आहे.

आजच्या युवा पिढीने 'देशाने माझ्यासाठी काय केले, यापेक्षा मी देशासाठी काय करू शकतो' याचा विचार केला पाहिजे. व्यक्ती कितीही मोठी असली तरी व्यक्तीपेक्षा राष्ट्र मोठे आहे म्हणून राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकता या दोन गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. या दोन गोष्टींच्या अभावामुळे आपल्या देशात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आज जागतिक पातळीवर देशातील प्रत्येकाची ओळख आपल्या देशामुळे आहे. त्यामुळे आपल्या देशाचे तन मन धनाने रक्षण करणे आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी देशभरातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्तीचे धडे देऊन त्यांच्यात राष्ट्रभक्तीची बीजे रोवली पाहिजेत. शाळा, महाविद्यालयांनी ही जबाबदारी घेऊन विविध मार्गांनी आजच्या युवा पिढीला देशाची सेवा करण्यासाठी सज्ज करणे आवश्यक आहे. आपल्या जबाबदारीतून, मेहनतीतून आजच्या युवा पिढीने आपली राष्ट्रभक्ती दाखवून दिली पाहिजे. यामुळे येणाऱ्या पुढील पिढ्यांमध्ये देखील राष्ट्रभक्तीची मशाल चिरकाल पेटत राहील.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

### अक्षय्य तृतीयेचे महत्त्व

अक्षय्य तृतीया, ज्याला आखा तीज असेही म्हटले जाते. हा सण वैशाख महिन्याच्या शुद्ध तृतीयेला साजरा केला जातो. हा दिवस हिंदू धर्मातील अत्यंत शुभ व महत्त्वाचा दिवस मानला जातो. 'अक्षय' म्हणजे कधीही संपुष्टात न येणारे, जे कायम टिकून राहते. या दिवशी केलेले दान, पुण्य, जप, तप, हवन, पूजन, व्रत यांचे फळ अक्षय्य म्हणजेच अविनाशी आणि सात जन्मांसाठी कल्याणकारक मानले जाते. याच दिवशी पितरांना पाणी पाजण्याकरिता मातीचे कुंभ दान करून उन्हाळात तयार करण्यात आलेले कुरडया, पापड, शेवया, आंब्याचे पन्हे, आमरस याचा नैवेद्य देवाला आणि पितरांना दाखवूनच खायला सुरुवात केली जाते. याच दिवसापासून घड्यातले पाणी पिण्याकरिता वापरले जाते.

हिंदू पुराणानुसार, या दिवशी भगवान परशुरामाचा जन्म झाला. याच दिवशी वेद व्यासांनी आणि भगवान गणेशांनी भागवत पुराण लेखनास सुरुवात केली होती. काही कथांनुसार, श्रीकृष्णाने पांडव वनवासात असताना द्रौपदीला अक्षय पात्र दिले होते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशीच श्रीकृष्णाला सुदामा भेटले अणि श्रीकृष्णाने सुदामाचे ब्राह्मण म्हणून पाद्यपूजन केले होते. म्हणून वैशाख महिन्यात ब्राह्मणांचे पाद्यपूजन (वसंत पजा) वैदिक मंत्रजागर करण्याची प्रथा आहे. याच दिवशी पवित्र



गंगा पृथ्वीवर अवतरली. याच दिवशी सोने, चांदी धनसंपत्तीची देवता कुबेर हेही अवतरले म्हणून या दिवशी सोने, नाणे विकत घेतल्यामुळे घरात सोने-चांदी भरभराटीचे मानले जाते. या सर्व घटनांनी या दिवशीचे धार्मिक महत्त्व अधिक आहे. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, दसरा, बलिप्रतिपदा हे वर्षातले साडेतीन मुहूर्त आहेत. पण फक्त अक्षय्य तृतीया याच मुहूर्तावर लग्न, मौंज केली जाते. या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून देवपूजा केली जाते. गाईंना चारा, ब्राह्मणांना अन्नदान व वस्त्रदान केले जाते. आजच्या या धावपळीच्या युगात जिथे स्वार्थ अधिक आणि सेवा कमी आहे, तिथे या सणाचे खरे मूल्य समजून घेणे गरजेचे आहे.

**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

### डिजिटल शिष्टाचार, काळाची गरज

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टी बदलल्या आहेत. पूर्वी कार्यालयीन कामकाज केवळ प्रत्यक्ष संवाद, चिठ्ठ्या, पत्रव्यवहार आणि फोनवर आधारित असायचे. मात्र, आता व्हॉट्स ॲप, ई-मेल, झूम, टिम्स यासारख्या डिजिटल माध्यमांमुळे संवादाची नवी दारे खुली झाली आहेत. प्रशासनात आणि शासकीय यंत्रणेतही या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. मात्र, याच तंत्रज्ञानामुळे अनेक वेळा अयोग्य वेळेस सूचना, आदेश किंवा मेसेज येण्याच्या घटना घडतात, त्यामुळे डिजिटल शिष्टाचार पाळण्याची गरज अधिक ठळक होते.

आजच्या काळात प्रशासकीय गटांवर सूचना देण्याचे एक निश्चित स्वरूप असावे का, हा प्रश्न अनेकदा उपस्थित होतो. कार्यालयीन वेळेनंतर सूचना पाठवण्यासंबंधी कोणतेही ठोस नियम नसले, तरी काही राज्यांत आणि देशांत यावर मार्गदर्शक तत्त्वे लागू केली जात आहेत. जसे की, युरोपमधील काही देशांत कर्मचाऱ्यांना कामाच्या वेळेनंतर ई-मेल किंवा मेसेज पाठवण्यावर निर्बंध आहेत. भारतात मात्र अशा स्वरूपाचे कठोर नियम नाहीत, पण काही सरकारी विभागांनी वेळेच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत.

कार्यालयीन वेळेच्या बाहेर फक्त अति महत्त्वाच्या आणि तातडीच्या सूचना दिल्या जाव्यात, हा एक अलिखित नियम तयार झाला आहे. यामध्ये एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कर्मचाऱ्यांचा मानसिक आरोग्याचा आणि त्यांच्या खाजगी आयुष्याचा सन्मान राखला गेला पाहिजे. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला कुटुंबासोबत वेळ घालवण्याचा, विश्रांती घेण्याचा आणि इतर व्यक्तिगत जबाबदाऱ्या पार पाडण्याचा पूर्ण हक्क असतो. अशा वेळी सतत प्रशासनाच्या गटावर सूचना, आदेश, चर्चा होत राहिल्या, तर कर्मचाऱ्यांवर मानसिक तणाव निर्माण होण्याची शक्यता वाढते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सूचना देताना वापरण्यात येणारी भाषा आणि पद्धत. प्रशासकीय गटांवर दिल्या जाणाऱ्या सूचना स्पष्ट, संक्षिप्त आणि प्रासंगिक असाव्यात. कोणत्याही प्रकारची अनावश्यक माहिती, अनावश्यक चर्चा किंवा खाजगी विचार या ठिकाणी मांडणे योग्य नाही. डिजिटल शिष्टाचाराचा विचार करताना तांत्रिक आणि कायदेशीर बाबींचाही विचार करावा लागतो. कार्यालयीन वेळेनंतर सूचना पाठवण्यासंबंधी भारतात ठोस कायदे नाहीत, पण श्रम कायद्यांतर्गत कर्मचाऱ्यांना विश्रांतीचा अधिकार दिला आहे. काही खाजगी कंपन्या आणि मोठ्या संस्थांनी राईट टू डिस्कनेक्ट हा नियम स्वीकारला आहे, ज्यानुसार कामाच्या वेळेनंतर कर्मचाऱ्यांना संपर्क न करण्याचे धोरण आहे.

शासकीय गटांमध्ये सूचना पाठवण्याची वेळ निश्चित केली, तर त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. कार्यालयीन वेळेत दिलेल्या सूचना अधिक प्रभावी ठरतात आणि त्या वेळेतच त्यावर कार्यवाही करता येते. रात्री उशिरा किंवा सुटीच्या दिवशी आलेल्या संदेशांकडे अनेकदा दुर्लक्ष होते किंवा त्यावर तातडीने प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे कामाचा ढिसाळपणा वाढतो. शिवाय, सतत सूचना मिळत राहिल्यास कर्मचाऱ्यांच्या मानसिक तणावात भर पडते, त्यामुळे त्यांच्या उत्पादकतेवरही परिणाम होतो.

प्रत्येक विभागाने काही नियम निश्चित करावेत-

कार्यालयीन वेळ संपल्यानंतर केवळ अत्यावश्यक सूचना द्याव्यात. कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचा आदर राखला जाईल, याची काळजी घ्यावी. सूचना पाठवताना व्यावसायिक भाषा आणि आदरयुक्त संवाद राखावा. प्रशासनाने 'नो मेसेज अवर' किंवा 'ऑफिस अवर पॉलिसी' ठरवावी. या सर्व बाबींचा विचार करता, डिजिटल माध्यमे हा एक महत्त्वाचा भाग बनला असला, तरी त्याचा वापर विवेकाने आणि जबाबदारीने करावा. प्रशासनाने आणि कर्मचाऱ्यांनी यासंदर्भात परस्पर सहकार्य आणि समजूतदारपणा ठेवला, तर डिजिटल शिष्टाचाराचा योग्य तो आदर्श निर्माण करता येईल.

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### उपकाराचे ओझे नको रे बाबा!

सामाजिक जीवनात वावरत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, काही व्यक्ती चर्चेदरम्यान त्यांनी केलेल्या क्षुल्लक उपकाराचा पाढा अति उत्साहाने वाचत असतात. त्या मागचा त्यांचा नेमका हेतू काय? हे समोरच्या व्यक्तीच्या लक्षात येत नाही. त्यामुळे क्षणभर त्या व्यक्तीला ते, दानशूर कर्ण किंवा राजा हरिश्चंद्र यापैकी कुणाच्या तरी कुळातला असावा असा समज होतो.

पण प्रत्यक्षात सत्य मात्र वेगळेच असते. आत्मप्रौढीपणा हा त्यांचा जन्मजात गुण असतो. त्यामुळे ते अगदी लहान कार्य सुद्धा उपकार समजून करतात व असा आव आणतात की आमच्यासारखे उपकारकर्ते आम्हीच. कोणतेही कार्य असू द्या यांचं एकच पालुपद असतं, हे मी केलं, ते मी केलं, माझ्यामुळे झालं, माझ्याशिवाय हे काम कुणी करूच शकलं नसतं. आता हेच बघा ना त्रिंबक नानांकडे शेजारची व्यक्ती गोडलिंबाचा पाला मागायला आली. तेव्हा त्रिंबक नाना त्याला म्हणाले ''अरे वा! तुला गोडलिंब हवा, जा तोड त्या झाडाचा. पण सांभाळून, झाड उंच आहे. व्यवस्थित तोड, घाई करू नकोस, नाहीतर डहाळी तुटेल. हवा तेवढाच घे, उगीच वाया जायला नको. चार वर्षांपासून आम्ही त्या झाडाची प्राणपणाने जोपासना करीत आहोत कळलं का? गोडलिंब कढीत टाकायला हवा तेवढाच घे, नाहीतर त्याचीच कढी करायची म्हणून घेशील.'' असा उपरोधिक टोमणा मारला आणि गोडलिंब दिल्याबद्दल शेजारच्याने आपल्याशी आजन्म उपकृत राहावे असा त्रिंबक नानांच्या चेहऱ्यावरचा भाव होता व तो प्रकट करण्याची घाई त्यांना झाली होती. संधी मिळेल तेव्हा चारचौघात गोडलिंब उपकार पुराण सांगणार हे निश्चित होते. नेमके असेच अनुभव तुम्हाला प्रसंगानुरूप आले असतील.

अशा प्रकारच्या व्यक्तीत तुम्ही कितीही सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले तरी त्यांच्या स्वभावात यत्किंचितही सुधारणा होत नाही. कारण त्यांचा तो उपजतच स्वभाव असतो. त्यामुळे त्यांना बदलण्याच्या भानगडीत न पडता अंतर राखून सुरक्षित राहायला हवं. अन्यथा तुम्हाला गरज नसताना सुद्धा जबरदस्तीने ते तुमच्यावर उपकार करतील आणि गावभर सांगत सुटतील. असा प्रसंग आपल्यासोबत घडू नये म्हणून, आयुष्यात एखाद्या कठीण प्रसंगी जर कुणाचे उपकार घ्यायची वेळ आलीच तर, तो आपल्या आत्मसन्मानाला ठेच तर पोहचवणार नाही ना याची दक्षता घ्यायला हवी. जमेस्तोवर कुणाचे क्षुल्लक उपकार घेऊ नये, कधी अशा प्रकारच्या व्यक्तींकडून काही घेऊ नये, ज्या परिस्थितीत आहोत त्याच परिस्थितीत स्वतःला सावरून घ्यायचं, अडचण अल्पकालीन असते पण यांचे उपकार मात्र आयुष्यभर स्मरणात ठेवावे लागतात व त्याचे मोलही चुकवावे लागते. निसर्गाने मानवाला कधीच त्याच्या उपकाराची जाणीव करून दिली नाही. मग आपण का करून द्यायची.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती बडनेरा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती धाराशिव, सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा शुभारंभ दि. २५-४-२५ रोजी सहाय्यक निबंधक माधव अंबिलपुरे सभापती राजेंद्र बाळासाहेब पाटील उपसभापती शेषराव चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

आरोग्य शिबीर यशस्वीरित्या संपन्न करण्याकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी कर्मचारी डॉ. स्वप्निल सांगळे अनुजा कंदले डॉ. शितल पिसाळ डॉ. अनुभूती दीक्षित, डॉ. श्रेयती कुमार गावडे, डॉ. पठाण सनीला, समाजसेवा अधीक्षक सय्यद खय्युम व आरोग्य शिक्षक शेख अल्लाउद्दीन यांनी मोफत आरोग्य शिबिरासाठी विशेष मेहनत घेतली.



मुख्यमंत्रीयांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील शंभर दिवसाचा कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनेनुसार कार्यक्रम राबविण्यात आला. त्यावेळी सर्व सन्माननीय संचालक मंडळ व समितीचे सचिव एस.डी. माने सर्व आडते व्यापारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



# डिजिटल तहसील कार्यालयात मूलभूत सुविधांचा अभाव

### वृद्ध नागरिक व महिलांना सर्वाधिक अडचणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

शहरातील तहसील कार्यालय डिजिटल युगात प्रवेश करत असताना देखील, येथील भौतिक सुविधांचा पुरता अभाव आहे. नागरिकांची कामे ऑनलाईन पद्धतीने होत असली, तरी तहसील कार्यालय परिसरात पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहांची व इतर मूलभूत गरजांची कमतरता आहे. यामुळे भ्रष्टाचारात गुंतलेल्या तहसील कार्यालयाला जाग कधी येणार हा प्रश्नच आहे.

अनेकदा तहसील कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी विकत पाणी घेवून तहान भागवावी लागते. कार्यालयाच्या आवारात पिण्याच्या पाण्याची टाकी, शुद्ध पाण्याची सोय किंवा फील्टर यापैकी काहीच उपलब्ध नाही. परिणामी, उन्हाळ्याच्या या तडाख्यात लोकांना तहसीलमधील कामासोबतच पाण्याच्या शोधातही वणवण करावी लागत आहे.

स्वच्छतागृहांच्या अभावामुळे परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. नागरिक व कर्मचाऱ्यांना लघुशंका किंवा शौचालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जावे लागते. तहसील कार्यालयात स्वतःचे स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याने हे दुर्दैवी चित्र पाहायला मिळते.

महिलांसाठी तर ही परिस्थिती अधिकच क्लेशदायक बनली आहे. महिला कर्मचारी व कार्यालयात येणाऱ्या महिलांना स्वच्छतागृहासाठी जवळच्या नियोजन भवनाचा आधार घ्यावा लागतो. तिथपर्यंत चालत जावे लागल्याने त्यांना प्रचंड त्रास होतो, तसेच वेळेचा अपव्ययही मोठ्या प्रमाणात होतो.

सर्वसामान्य नागरिकच नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांनाही तहसील कार्यालयात योग्य प्रकारची वागणूक मिळत नाही. वयोवृद्ध नागरिकांना रांगेत तासन् तास आपल्या कामासाठी उभे राहावे लागते. त्यांच्यासाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था नाही, तसेच एखादी सावली किंवा निवांतपणे विश्रांती घेता येईल अशी जागाही नाही. अनेक ज्येष्ठ नागरिक तहसील कार्यालयाच्या या असुविधांबद्दल नाराजी व्यक्त करताना दिसतात.

डिजिटल यंत्रणा आली खरी, पण आम्हाला अजून मूलभूत गोष्टी मिळालेल्या नाहीत. आम्ही वृद्ध माणसे तासन् तास उभे राहतो, कोणी विचारतही नाही, असे एका ज्येष्ठ नागरिकाने सांगितले. या संपूर्ण परिस्थितीवर प्रशासनाने डोळे झाकलेली असल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. तहसील कार्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येतात.

त्यामध्ये महिला, वृद्ध, दिव्यांग अशा विविध गटांतील लोकांचा समावेश असतो. तरीदेखील नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. सर्वत्र डिजिटल क्रांतीचा गजर असताना, तहसील कार्यालय मात्र मूलभूत सोयींअभावी मागे पडले आहे. ऑनलाईन सेवा आणि ई-गव्हर्नन्सच्या नावाखाली लाखो रुपये खर्च होत असताना, फक्त काही हजार रुपयांत सुटणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी व स्वच्छतागृहांच्या निर्मितीसाठी कोणी पुढाकार घेत नाही, हे दुर्दैवाचे आहे.



प्रशासनाकडून या बाबतीत केवळ कोरड्या घोषणा होत आहेत. प्रत्यक्ष कृती मात्र शून्य आहे. नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. तहसील कार्यालयाचा कारभार फक्त ऑनलाईन सुविधांवर चालवणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष येणाऱ्या नागरिकांची देखील काळजी घेणे गरजेचे आहे.

तहसील कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना योग्य सुविधा मिळाव्यात, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर त्वरीत उपाययोजना करण्याची मागणीही होत आहे.

## पाकिस्तानचे नाव जगाच्या नकाशावरून मिटवावे : नळदुर्गकरांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ एप्रिल -**

जम्मु -काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा नळदुर्ग शहरवासियांच्या वतीने जाहीर निषेध कारण्यात आला असुन यावेळी या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिंदु बांधवाना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर दहशतवाद्यांनी सशस्त्र हल्ला केला. या हल्ल्यामध्ये २८ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा संपुर्ण जगातुन निषेध होत आहे. दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता नळदुर्ग शहरातील मुख्य चावडी चौकात सर्व पक्षीय व हिंदु बांधवांच्या वतीने पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करण्यात आला. त्याचबरोबर या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिंदु बांधवांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक व भाजपचे शहर अध्यक्ष बसवराज धरणे, संजय बताले विनायक अहंकारी, सुधीर हजारे, नळदुर्ग शहर व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष मुकुंद कुलकर्णी, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, विजय ठाकुर, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, गणेश मोरडे, व्यापारी महासंघाचे, सुभाष कोरे, सुहास पाटील, राजेंद्र महाबोले, विलास येडगे, जमन ठाकुर, राजकुमार वैद्य, शिवसेनेचे बंडप्पा कसेकर, पप्पु पाटील यांच्यासह हिंदु बांधव उपस्थित होते.

## जयप्रकाश विद्यालयाचे आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर (ता.जि. धाराशिव) येथील ०८ विद्यार्थी शिष्यवृत्तीस प्राप्त झाले असुन विद्यालयाने घवघवीत यश मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीचे ०५ विद्यार्थी तर आठवीचे ०३ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. विद्यालयातील शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थी इयत्ता ५ वी तील ५ विद्यार्थ्यी पात्र झाले यात भोसले प्रणवी भीमराव, क्षिरसागर स्वराली प्रमोद, बारगुळे शिवांगी कल्याण, लोमटे आरोही अरुण, चव्हाण संदेश आबासाहेब तर इयत्ता ८ वी तील ३ विद्यार्थी पात्र झाले. गुंड श्रध्दा ज्ञानेश्वर, गडीकर शिवम गोंविद, कस्पटे अनुष्का गंगाराम हे यशस्वी विद्यार्थी आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना सचिन कांबळे, योहान वसावे, अभिजीत घोळवे, मोहन चव्हाण, काकासाहेब डोंगरे, विनय सारंग यांनी मार्गदर्शन केले.

या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

## तुळजापूर पं.स. फुलझाडांचा टांगता बगीचा

### विविध फुलझाडे आणि शोभिवंत झाडांची लागवड आणि जोपासना करून अनोखा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ एप्रिल -**

गटविकास अधिकारी आणि प्रशासन अधिकारी यांच्या संकल्पनेतुन नर्सरीमधील विविध फुलझाडे आणि शोभिवंत झाडांची पंचायत समितीच्या अंतर्गत खुल्या ओपन पोर्चमध्ये छोट्याशा कुंड्यांत आणि हँगिंग बास्केटमध्ये फुलांची जोपासना करत परिसर सजावट केलेली दिसून येत आहे.

तुळजापूर पंचायत समितीत अगदी लहान जागेत अडकवलेले शिंकाळे आणि कुंडीतील रोप जागेचं सौंदर्य वाढवतं आहेत, फुलझाडांची टांगती शिंकाळी (हँगिंग बास्केट) सुंदरच दिसत असून त्यांचा प्रभावही सकारात्मक पडतो. त्यामुळे वातावरणात सजीवता निर्माण होते आणि मनही प्रसन्न होते.



घर असो वा कार्यालय फुलबाग किंवा हिरवीगार शोभेवंत वृक्ष सभोवताली असतील तर मन प्रसन्न राहते. फुले आपल्या डोळ्यांना दिसतात तेव्हा आनंदित होऊन जातो. कामाचा ताण ही कमी जाणवतो.याच हेतून पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्व खर्चातून जवळपास शंभर विविध फुलांची आणि शोभेवंत वृक्ष दैनंदिन पाणी घालून जोपासली आहेत.

सहायक लेखा अधिकारी रामदास जगताप, कनिष्ट प्रशासन अधिकारी उमदेवी मगर, सुखदेव पांडागळे, वरीष्ठ सहायक यशवंत सोनटक्के, कनिष्ठ सहायक तात्यासाहेब राठोड, विनोद गायकवाड, माणिकराव नाईकवाडी, कौशल्या सरडे, कल्पना शिंदे, रुपाली बोपलकर, राधा दराडे, किरण सावंत, दिलीप गायकवाड, अभिजित शिंदे, ललिता राठोड आदी कर्मचारी या अनोख्या बगीचाची देखभाल करत आहेत.

## भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाले हे समाजाचे श्रेय, समाजाच्या पाठिंब्यामुळेच संघर्ष करण्याची प्रेरणा : दिपक रणनवरे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ एप्रिल -**

नळदुर्ग येथे भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाबाबत सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रम मल्लिकार्जुन मंदिर येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला सुरुवात करण्यापुर्वी काश्मीर (पहलगाम) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरीकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर भगवान परशुराम, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणुन महामंडळ स्थापन होण्यासाठी अन्नत्याग करणारे उपोषणकर्ते व पेशवा युवा संघटनेचे संस्थापक दिपक भाऊ रणनवरे हे उपस्थित होते.

यानिमित्त त्यांचा ब्राह्मण समाजाच्या वतीने भव्य असा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात समाज बांधवाना दिपक रणनवरे यांनी महामंडळा बाबत सविस्तर मार्गदर्शन केले व याचा गरजुनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी पेशवा युवा संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी, सचिव मुकुंद नाईक यांनी हि आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौरभ रामदासी यांनी केले व आभार मनोज कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अजय अणदुरकर, प्रदीप ग्रामोपाध्ये, उमेश नाईक, महेश अंबुलगे, अजय देशपांडे, सचिन भुमकर, संदीप वैद्य, प्रसन्न कुलकर्णी, सचिन होर्टीकर, नितीन कुलकर्णी, राजकुमार वैद्य, सनी भुमकर, ज्ञानेश्वर केसकर, मयुर जोशी, सुदर्शन पुराणिक, आनंद कमठाणकर, संतोष नाईक यांच्यासह ब्राह्मण समाज संघटना, पेशवा युवा संघटना, परशुराम प्रतिष्ठान, मध्व मंडळ, उपाध्ये मंडळाचे सदस्य यांनी प्रयत्न केले.

## तुळजाभवानी मंदिरात सात संशयित पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ एप्रिल -**

तुळजाभवानी मंदिर परिसरात सात संशयित व्यक्ती गेल्या तीन दिवसांपासून संशयास्पद हालचाली करत असल्याचे सुरक्षारक्षकांच्या निदर्शनास आले. यानंतर या सर्व व्यक्तींना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

२३ एप्रिल रोजी सायंकाळी ५.२७ ते ५.३४ या दरम्यान, दर्शन मंडपाच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रवेशद्वाराजवळ काही व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरताना सुरक्षा रक्षक शिवाजी उमाप, फील्ड ऑफिसर बिभीषण माने आणि प्रकल्प व्यवस्थापक संग्राम पाटील यांच्या राउंड तपासणीदरम्यान आढळून आले. चौकशी केली असता या व्यक्तींनी फिरती उत्तरे दिली, त्यामुळे त्यांना त्वरित मंदिर परिसराबाहेर जाण्याचा सूचना देण्यात आली.

त्यानंतर २४ एप्रिल रोजी दुपारी ३.४० ते ३.४६ या वेळेत पुन्हा या व्यक्ती दर्शन मंडप परिसरात दिसून आल्या. फील्ड ऑफिसर बिभीषण माने, सुरक्षा निरीक्षक कमलाकर पवार व सुरक्षा रक्षकांनी त्यांना हटकले आणि ओळख विचारली, परंतु त्यांनी पुन्हा गोंधळलेली उत्तरे दिली. याची माहिती तातडीने मंदिर पोलिस चौकीला देण्यात आली. २५ एप्रिल रोजी सायंकाळी पुन्हा एकदा या सात व्यक्ती संशयितरीत्या वावरताना आढळल्यानंतर, चार सुरक्षा रक्षकांच्या मदतीने त्यांना मंदिर पोलिस चौकीत आणण्यात आले. त्यानंतर चौकशीसाठी त्यांना तुळजापूर शहर पोलिस चौकीत सुपूर्द करण्यात आले. या कारवाईत महिला सुरक्षा रक्षक शीतल केचे, सविता माने तसेच पुरुष सुरक्षा रक्षक हरिदास क्षीरसागर आणि रोहित सुरवसे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.




सदर प्रकरणी पुढील तपास तुळजापूर शहर पोलीस करीत आहेत.

## डॉ. आंबेडकर स्कूलचे स्कॉलरशिप परिक्षेत सुयश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ एप्रिल -**

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुलच्या विद्यार्थांनी इयत्ता पाचवी व आठवी शैक्षणिक वर्षे २०२४-२५ च्या स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश मिळविले असुन या परीक्षेमध्ये शाळेचे १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या दैदिप्यमान यशामुळे पुन्हा एकदा डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलने गुणवत्तेच्या बाबतीत आपणच नंबर एकचे असल्याचे दाखवुन दिले आहे.

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुल विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण देऊन सर्वचे क्षेत्रात विद्यार्थी परीपुर्ण व्हावेत यासाठी कायम प्रयत्नशील असते.या शाळेतील विद्यार्थी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही प्रविण्य मिळवत आहेत. संस्थेचे अध्यक्ष मारुती खारवे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अतिशय प्रतिकुल परीस्थितीत मारुती खारवे यांनी शहरातील विद्यार्थ्यांसाठी शहरात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली आहे. आज ही शाळा नळदुर्ग शहरातच नाही तर तालुक्यामध्ये गुणवत्तेच्या बाबतीत सर्वात पुढे आहे.

इयत्ता पाचवी व आठवी शैक्षणिक वर्षे २०२४-२५ मध्ये झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन यामध्ये डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कुलच्या विद्यार्थांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये शाळेतील एकुण १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये करपे अनुष्का अनिल, धुमाळ श्रद्धा दीपक, बेडगे राजश्री पुरुषोत्तम, कुरेशी खजामियाँ चांदसाब, मोसलगे सात्विक दत्तात्रय, इनामदार अब्दुरहमान वाजीद, कांबळे हर्ष अमोल, मनियार आफिया खय्युम, सय्यद आयेशा असलम, सुरवसे अनिरुद्ध हरीदास, भोकरे धनश्री वैजनाथ, डुकरे मोहित सुशांत, चिनगुंडे संचिता संजय, सुर्यवंशी मानसी शशिकांत, गायकवाड अमिता यशराज, चव्हाण प्रांजल प्रविण व गायकवाड सम्राट गणपती या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## तेरणाच्या फार्मसी विभागात अवयवदान जागृती आणि आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवस कृती आराखडा या अभियाना अंतर्गत येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील फार्मसी विभाग आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने अवयवदान जागृतता शिबिर नुकतेच अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या फार्मसी विभागात घेण्यात आले.

याविषयी जागृती नसल्यामुळे अनेकांना जिवंतपणीच अवयवा अभावी मरण यातना सहन कराव्या लागतात.

केवळ अशा रुग्णांना अवयदान या माध्यमातून चांगले जीवन जगता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवस कृती आराखडा या अभियाना अंतर्गत नुकतेच तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अवयवदान जागृतता शिबिर घेण्यात आले.

## गावठी दारूसह एकजण ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ एप्रिल -**

बेकायदेशीर मद्यविक्रीच्या उद्देशाने गावठी दारू जवळ बाळगल्याप्रकरणी वाशी पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध कारवाई केली आहे.

२६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता बोरगाव (ध) येथे बाबु त्रिंबक शिंदे (वय ४५, रा. बोरगाव (ध), ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी त्यांच्या पत्र्याच्या टपरीसमोर अंदाजे २,६०० रुपये किंमतीची ३० लिटर गावठी दारू अवैधरीत्या विक्रीसाठी साठवून ठेवली होती.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने प्रवीण बागल यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा क्रीडा प्रकारातील सर्वोच्च शिवछत्रपती मार्गदर्शक पुरस्कार २०२५ हा धाराशिव शहरातील भोसले हायस्कूल येथे कार्यरत असलेले क्रीडा शिक्षक प्रवीण बागल यांना जाहीर व प्रदान झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण बालेवाडी क्रीडा संकुल पुणे येथे महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मराठवाड्यातील हा पुरस्कार तिसरा असून धाराशिव जिल्ह्यातून दुसरा पुरस्कार प्रवीण बागल यांना प्राप्त झालेला आहे. खो-खो या खेळात अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडू घडविण्यामध्ये बागल यांचा सिंहाचा वाटा आहे.



प्रवीण बागल यांच्यामुळे धाराशिवच्या क्रीडा क्षेत्रात एक यशाचा परमोच्च तुरा रोवला गेला आहे. या अतिउच्च कामगिरीबद्दल प्रवीण बागल यांचा शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवचे उपाध्यक्ष अमोल सिरसट, बालाजी खोचरे, नितीन फंड, शुभम लोकरे, अविनाश रणखांब, दत्तात्रय जावळे, सचिन गायकवाड, योगेश अतकरे, ऋषिकेश काळे, व्यंकटेश पडिले, प्रतापसिंह काकडे, लिंबराज कुंभार इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## धाराशिव शहरात वाहतूक नियम भंगावर धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी २६ एप्रिल रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई केली. या मोहिमेत एकूण १८७ कारवाया करून तब्बल १,४६,६०० रुपयांचा 'तडजोड शुल्क' वसूल करण्यात आला आहे.

वाहतूक शिस्त राखण्यासाठी व अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत विविध प्रकारच्या वाहतूक नियम उल्लंघन प्रकरणांवर कारवाई करण्यात आली. वाहनाचे योग्य कागदपत्रे न बाळगणे, अवैध पार्किंग आदी प्रकारांचा समावेश होता.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जेवण वाढण्यावरून वाद, जमावाकडून मारहाण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बेंबळी, दि.२७ एप्रिल -**
लग्न समारंभात जेवण वाढण्याच्या किरकोळ कारणावरून मेंढा तांडा (ता. धाराशिव) येथे जमावाने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी बलभिम रामा राठोड (वय ४८ वर्षे, रा. मेंढा तांडा) यांच्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास बलभिम राठोड यांना विकास माणिक राठोड, अर्जुन शाहुराज पवार, विष्णु शाहुराज पवार (रा. उजनी तांडा, ता. औसा, जि. लातूर) तसेच सुभाष सखाराम जाधव, समाधान बब्रुवान राठोड, उषा बळी जाधव, वर्षा सुभाष जाधव, मिरा बब्रुवान राठोड आणि पारु माणिक राठोड (सर्व रा. मेंढा तांडा) यांनी एकत्र येऊन शिवीगाळ केली व लाथाबुक्यांनी, दगडांनी मारहाण करत जखमी केले.

यावेळी भांडण सोडवण्यासाठी आलेल्या साक्षीदारांनाही आरोपींनी मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच, फिर्यादी व साक्षीदारांना जिवे ठार मारण्याची धमकीही देण्यात आली.

बलभिम राठोड यांनी २६ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बेंबळी पोलीस करीत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



#### आदर्श शिक्षक प्रदिप खराडे यांचा सत्कार

**परंडा, दि.२७ एप्रिल -**
बावची विद्यालय परंडा येथे जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते प्रदिप खराडे यांचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात बावची विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे, मनोहर गंभीरे, शिवाजी खैरे हे उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने प्रदिप खराडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खराडे यांनी बावची विद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

#### अक्षरगंगा परिक्षेत रॉयल स्कूलचे यश

**परंडा, दि.२७ एप्रिल -**
परंडा तालुक्यातील आनाळा येथील जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत रॉयल पब्लिक स्कूलच्या



विद्यार्थ्यांनी अक्षरगंगा परिक्षेत घवघवित यश संपादन केले असून शाळेचा विद्यार्थी शिवराज रामदास क्षिरसागर यांने १५० पैकी १३० मार्क घेत जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. तर याच शाळेचा आर्णव शिवाजी देशमुख यांने ३०० पैकी १८० मार्क घेत केंद्रात सहावा येण्याचा मान पटकावला आहे. विशेष म्हणजे या शाळेचे दोनच विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष निशीकांत क्षिरसागर, सचिव प्रियंका क्षिरसागर, मुख्याध्यापक हनुमंत जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



#### परंड्यात यात्रेनिमित्त पाणपोईचा शुभारंभ

स्व. पांडुरंग मामा कोळगे यांच्या स्मरणार्थ पाणपोईचा शुभारंभ सोनारी चौक येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. सालाबादा प्रमाणे या ही वर्षी कोळगे परिवाराच्या वतीने भाविक भक्तांना थंड पाणी व गुळाचा खडा वाटप करण्यात येतो. यावेळी आशा मोरजकर, संजय काशीद, गणेश राशनकर, गोरख मोरजकर, समाधान खुळे, जाकीर पटेल, राजकुमार देशमुख आदी उपस्थित होते.

#### भीमराव डिग्गीकर यांचे निधन

**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**
आनंदनगर भागातील ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्त लेखाधिकारी भीमराव माणिकराव डिग्गीकर (वय ८३)



यांचे प्रदीर्घ आजाराने शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, चार विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कपिलधार स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. धाराशिव पेन्शनर्स सहकारी पतसंस्था उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. धाराशिव शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष डिग्गीकर यांचे ते वडील तर पत्रकार अजय कुलकर्णी यांचे ते सासरे होत.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद...

# शाळा, महाविद्यालयांत अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन होणार

### 'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**
आपल्या राज्य सरकारने अंमली पदार्थाबाबत 'झिरो टॉलरन्सचे' धोरण अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी राज्यभरातील शाळा, महाविद्यालयात अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये अँटी नार्कोटिक्स क्लब सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना यापूर्वीच सूचित केले आहे. जिल्ह्यातील पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही त्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. प्राप्त सामाजिक परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेऊन जिल्हा प्रशासनही याबाबत आता तत्परतेने योग्य ती पाऊले उचलत असून लवकरच याची अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा मित्र चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.



जिल्ह्यातील तरुण पिढीला या गंभीर संकटातून वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात अंमली पदार्थ विरोधी मोठी मोहीम उघडली आहे.

तरुण पिढीमध्ये व्यसनांचे वाढते प्रमाण पाहता याला वेळीच पायबंद घालण्यासाठी सरकार अनेक उपाययोजना करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील महाविद्यालयामध्ये 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करणार असल्याची घोषणा केली आहे. धाराशिव जिल्ह्यात देखील आपण केवळ ड्रग्ज नव्हे तर इतर सिगारेट, मद्य यासारख्या विविध घातक व्यसनांच्या विळख्यातून तरुणाईला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत आहोत.

तुळजापूर मतदारसंघातील महाविद्यालयात 'अंमली पदार्थ विरोधी क्लब' स्थापन करण्याच्या अनुषंगाने ६ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी धाराशिव, तहसीलदार तुळजापूर, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक व चार महाविद्यालयांच्या प्रचार्यांसोबत बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीत पोलीस प्रशासन व पालकांनाही सोबत घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याच धर्तीवर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात 'अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन' करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेतली असून लवकरच त्याची अंमलबजावणी होणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

> आपल्या सरकारने अंमली पदार्थाबाबत झिरो टॉलरन्सचे धोरण अंमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी राज्यभरातील शाळा, महाविद्यालयात अँटी नार्कोटिक्स क्लब स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. तरुण पिढी अंमली पदार्थांचे सेवनासह सिगारेट, मद्य यासारख्या व्यसनांच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीला यापासून वाचवण्यासाठी ही अत्यंत उपयुक्त कृती असणार आहे. त्यामुळे प्रशासनासोबत पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी देखील यात सहभागी नोंदवावा. धाराशिव जिल्ह्यातील काही भागात अंमली पदार्थांची तस्करी व सेवनाचे प्रकार समोर आले आहेत. नागरिकांनी पोलिसांना दिलेल्या माहितीमुळे हे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे गृह विभागाला कारवाई करताना सहकार्य झाले. यापुढील काळात देखील आपल्या आजूबाजूला असे प्रकार घडत असतील तर तातडीने माहिती द्यावी. ड्रग्ज तस्करी, ड्रग्ज सेवनाची माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आश्वासनही आ. पाटील यांनी यावेळी दिले आहे.

## तरुणाकडून मुलीवर बलात्कार; उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**
एका २८ वर्षीय मुलीवर गावातील तरुणाने मारहाण करत धमकी देत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आरोपीने पीडितेला मारहाण करून धमकावत तिच्यावर अत्याचार केला. यावेळी त्याने मित्राच्या कारमध्ये बसवून तिला शेतात नेले आणि तेथे बळजबरी केली. या अमानुष कृत्यामुळे पीडिता गर्भवतीही झाली असल्याची माहिती तिने आपल्या तक्रारीत नमूद केली आहे.

पीडितेने २६ एप्रिल २०२५ रोजी उमरगा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेला उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**
जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत २०२४-२५ या वर्षात २६९ जलसाठ्यांमधून तब्बल १ कोटी १० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. गाळ काढण्याचे काम अशासकीय संस्थांनी केले असून, सुमारे १० हजार शेतकऱ्यांनी स्वखर्चाने गाळ वाहून नेऊन ११ हजार हेक्टर क्षेत्रावर पसरवला आहे.



या उपक्रमामुळे मुरमाड व खडकाळ जमीन सुपीक झाली असून ८८०० घनमीटर पाणीसाठा पुनर्संचित करण्यात यश आले आहे. शासन अशासकीय संस्था व ग्रामपंचायतींना मशीन व इंधन भाडे देणार आहे. तसेच अल्पभूधारक तसेच विधवा, अपंग व आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकऱ्यांना गाळ वाहून नेण्यासाठी अनुदान मिळणार आहे.

योजनेंतर्गत वाढलेली जलसाठ्यांची क्षमता व जमीन सुपीकतेत झालेली सुधारणा जिल्ह्यातील कृषी उत्पादनात मोठी वाढ घडवून आणण्यास मदत करणार आहे.

# नळदुर्ग किल्ल्यावरून अतिक्रमण हटवण्याची कार्यवाही सुरु

### ३ मे २०२५ अंतिम मुदत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ एप्रिल -**
नळदुर्ग किल्ल्याच्या आत व प्रवेशद्वारासमोरील अतिक्रमण हटवण्यासाठी प्रशासनाने निर्णायक पाऊल उचलले आहे. सहाय्यक संचालक पुरातत्त्व विभाग छत्रपती संभाजीनगर (विलास येडगे) यांनी दिलेल्या यादीच्या आधारे नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने संबंधित अतिक्रमण धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार अतिक्रमण धारकांनी ३ मे २०२५ पर्यंत स्वखर्चाने अतिक्रमण हटवावे, अन्यथा प्रशासनामार्फत अतिक्रमण निष्कासित करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या कार्यवाहीत किल्ल्याच्या आतल्या ३० आणि किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोरील ८७ अतिक्रमण धारकांना नोटीस बजावली गेली आहे.



राज्य शासनाच्या आदेशानुसार गड-किल्ल्यांवरील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि ऐतिहासिक वास्तुंच्या सौंदर्यावर होणारा परिणाम लक्षात घेता अतिक्रमण दूर करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

यासंदर्भात २७ जानेवारी २०२५ व ९ एप्रिल २०२५ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठका घेण्यात आल्या होत्या. बैठकीनंतर नळदुर्ग किल्ल्याच्या परिसरात संयुक्त सर्वेक्षण करून अतिक्रमण धारकांची यादी तयार करण्यात आली.

जिल्हाधिकारी धाराशिव व सहाय्यक संचालक (पुरातत्त्व) यांच्या आदेशानुसार ही कारवाई महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्वविषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० व संबंधित शासन परिपत्रकाच्या तरतुदींनुसार राबवली जात आहे. उपविभागीय अधिकारी धाराशिव यांच्या आदेशाने मुख्याधिकारी, नळदुर्ग नगरपरिषद यांनी अतिक्रमण धारकांना नोटीस बजावली असून, अतिक्रमण न हटवल्यास प्रशासकीय कारवाईबरोबरच त्याचा खर्चही संबंधितांकडून वसूल करण्यात येणार आहे.

नोटीसीच्या प्रती जिल्हाधिकारी धाराशिव, उपविभागीय अधिकारी धाराशिव, तहसीलदार तुळजापूर, सहाय्यक संचालक (पुरातत्व) छत्रपती संभाजीनगर आणि पोलिस निरीक्षक, नळदुर्ग पोलिस ठाणे यांनाही देण्यात आल्या आहेत.

## सेवा हक्क दिन व दशकपूर्तीनिमित्त २८ एप्रिलला कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**
दि.२८ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीला दहा वर्षे पूर्ण होत आहे.या दशकपूर्तीच्या औचित्याने धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथील सभागृहात सेवा हक्क दिन कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.शासनाने दिलेल्या सूचनेनुसार हा दिवस मोठ्या जनसहभागासह साजरा करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व 'आपले सरकार' पोर्टलमार्फत मिळणाऱ्या ऑनलाईन सेवांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला पालकमंत्री, खासदार, विधान परिषदेचे व विधानसभेचे सदस्य यांची उपस्थिती राहणार आहे.

या निमित्ताने जिल्ह्यात जनजागृती मोहीमा, कार्यशाळा व विविध उपक्रम राबवले जाणार असून, नागरिकांना सेवा हक्कांच्या संदर्भातील माहिती अधिक व्यापकपणे दिली जाणार आहे.

# श्री काळ भैरवनाथांच्या नावाचं चांगभलं; भाविकांच्या उपस्थितीत दुमदुमली सोनारी नगरी

### कावड नाचविणाऱ्या लाखो भाविकांच्या बंध नृत्यात निघाली भैरवनाथांची पालखी मिरवणूक... रथोत्सवात भाविकांची लक्षणीय उपस्थिती... रथावर गुलाल, खोबऱ्याची धळण...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ एप्रिल -**
श्री भैरवनाथांच्या चैत्र यात्रेनिमित्त शनिवारी श्रीक्षेत्र सोनारी पंचक्रोशीतील लाखो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. 'भैरोबाच्या रथाचं चांगभलं' च्या जयघोषात मुख्य रथोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. रथ मंदिराच्या प्रवेशद्वारावर येताच दुतर्फा उभारलेल्या भाविकांनी गुलाल, खोबऱ्यांची उधळण केली.

श्री काळ भैरवनाथांच्या धार्मिक विधीला पहाटे तीन वाजल्यापासून प्रारंभ झाला. कंडारी येथील मानाच्या कावहीद्वारे पाण्याने श्री काळभैरवनाथ जोगेश्वरीला अभिषेक घालण्यात आला. दुपारी १.२५ वाजता मुख्य पुजाऱ्यांनी देवाला नैवेद्य दाखवल्यानंतर तहसीलदार नीलेश काकडे यांच्या हस्ते शासकीय आरती करण्यात आली.

दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत, देवस्थानच्या व यात्रा कमिटीच्या वतीने उत्सवमूर्तीची रथात प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रारंभी भोंजा येथील पाटील कुटुंब व ग्रामस्थ यांच्या वतीने मानाचा नाडा रथाला बोधून मुख्य मंदिरातून ओढण्यास सुरुवात झाली. सर्वांत पुढे धुपारती घेऊन समीर पुजारी होते.



त्यांच्यासोबत अब्दागिरीवाले, चौरेवाले, त्यानंतर मानाची बहीण, त्यामागे मानाची कंडारीची कावड, सोबत भैरवनाथाची पालखी, लाकडी हत्ती, घोडा, त्यापाठोपाठ नाथांचा रथ होता. रथ ओढण्यासाठी भाविकांनी तोबा गर्दी केली होती. रथाच्या पुढे व मागे नाड्याला हजारो भाविक धरून रथोत्सवात सहभागी झाले होते. रथ मंदिराच्या प्रवेशद्वारावर येताच दुतर्फा उभारलेल्या भाविकांनी भैरवनाथाचं चांगभले, भैरवनाथाच्या घोड्याचे चांगभलं, भैरवनाथाच्या काठीचं चांगभलं, असा उद्घोष करीत रथावर गुलाल, खोबऱ्याची उधळण केली. जागोजागी रथ थांबवून रथाला नवसाची तोरणे चढवली जात होती. स्थाने संपूर्ण सोनारी पंचक्रोशीला प्रदक्षिणा घातल्यानंतर सायंकाळी ५ वाजता रथ मंदिरात विसावला. यावेळी श्री काळभैरवनाथ गुरू गादीचे मठाधीपती शामनाथ महाराज, मुख्य पुजारी संजय महाराज पुजारी, तहसीलदार नीलेश काकडे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष नवनाथ जगताप, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत, सरपंच परमेश्वर मांडवे, दीपक पाटील, सुभाषसिंह सद्दीवाल, संजयकुमार बनसोडे, पांडुरंग माळेकर, मोहन राऊत, सपोनि गोरक्ष खरड, बालाजी महाराज बोराडे, दुर्गाप्पा पार, मेहबूब आत्तार, हरिश्चंद्र चौधरी, अंगद फरतडे, रामकृष्ण पाटील, सचिन पवार, महादेव सांगडे, नवनाथ साबळे, आदी उपस्थित होते.

परंडा तालुक्यातील सोनारी येथील श्री काळ भैरवनाथांचा शनिवारी रथोत्सव उत्साहात पार पडला, दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक आले होते.



# जिल्ह्यातील विकासकामे दर्जेदार करण्यास प्राधान्य द्या- उपमुख्यमंत्री पवार

**✲ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरुच राहणार ✲ विकास कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश**

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यशासन पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकास कामे वेगाने व गुणवत्तापूर्ण करण्यास प्राधान्य देत आहेत. या विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी करताना ती मुदतीत व दर्जेदारपणे पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे वित्तमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व कार्यान्वयीन यंत्रणा प्रमुखांना आज आयोजित आढावा बैठकीत दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार संजय जाधव, विधान परिषद सदस्य विक्रम काळे, आमदार सर्वश्री डॉ. राहुल पाटील, रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी उपस्थित होते.

राज्यशासन नागरिकांना विकासकामांच्या माध्यमातून सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देत असल्याचे सांगून श्री. पवार म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनाही प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यशासनाच्या तिजोरीतून विकासकामांना दिला जाणारा निधी यापुढेही कमी पडणार नाही. मात्र जिल्हा प्रशासनाने शासनाच्या योजनांची योग्य आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. यामध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधीचा गैरवापर झाल्यास अजिबात खपवून घेतले जाणार नाही. जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधा निर्माण करताना त्यांचा दर्जा राखा. कंत्राटदारांना वेळेत निधी दिला तरच दर्जेदार कामे होतील, असेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कामे वेळेत पूर्ण करावीत. असे सांगून परभणी शहर आणि कार्यालयातील स्वच्छतेवर भर द्यावा. कारण या १०० दिवसांच्या कामांची तपासणी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरुच राहणार✲

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महत्त्वाकांक्षी योजना असून ही योजना बंद होणार नसल्याचे श्री. पवार यांनी निक्षून सांगताना लाडक्या बहिणींना दिलेले पैसे परत घेतले जाणार नाहीत. मात्र, गरजू आणि पात्र लाडक्या बहिणींनाच हा निधी मिळेल, याची दक्षता घ्यावी.

गतवर्षी जिल्ह्यात मुबलक पाऊस पडला होता. यंदाही चांगले पर्जन्यमान होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून व्यक्त करण्यात आला असल्याचे सांगून पाऊस पडेपर्यंत एप्रिल, मे या महिन्यात पाणीपट्टी थकबाकी वसुली करताना नागरिकांना जास्त ताण न देता पिण्याचे पाणी देण्यास प्राधान्य देण्याचे निर्देश श्री. पवार यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच जिल्ह्यात चारा व पाणीटंचाई प्रश्न उद्भवणार नाही, याची काळजी घेताना उन्हाळ्यात कोणतीही चारापाण्याची अडचण येणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच वाडी, वस्ती तांड्यांवर मागणी आल्यास तात्काळ पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी-तहसीलदारांना दिले.

शासनाच्या ॲग्रीस्टॅक या महत्त्वाकांक्षी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे सांगताना जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांनी यावर विशेष लक्ष देण्यास सांगितले. तसेच नैसर्गिक आपत्तीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अनुदान, शेतकरी आत्महत्या आढावा त्यांनी घेतला. तसेच गाव नमुना -८ प्रमाणे अतिक्रमण, बंद झालेले पाणंद रस्ते, शेतरस्ते, शिवार रस्ते मोकळे करण्याच्या सूचना करताना रामटेक विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांसारखी कामे करावीत. त्यासाठी नागपूर जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

सौरऊर्जा हा राज्य शासनाचा महत्त्वाचा प्रकल्प असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही श्री. पवार यांनी संबंधित यंत्रणेला दिले. तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या घरकुल आवास योजनांना लागणारी १० टक्के रेती महसूल विभागाने मोफत उपलब्ध करून द्यावी. तसेच इतर बांधकामांना लागणाऱ्या रेतीला टप्प्याटप्प्याने क्रशसँडचा पर्यायी वापर वाढविण्याच्या सूचना केल्या.

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या स्वस्त धान्याचे, संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांचे वितरण डीबीटीद्वारे करण्यासाठी आवश्यक सर्व्हे ३० जूनपर्यंत १०० टक्के पूर्ण करावे. तसेच लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचनांचीही अंमलबजावणी करण्यास सांगितले. धान्याचे वितरण उशिराने होणे, ही गंभीर बाब असल्याचे सांगून त्यात तात्काळ सुधारणा करण्याच्या सूचना केल्या.

उपचारापासून कुणी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यातील कुणीही उपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना श्री. पवार यांनी केली. त्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी विशेष कक्षाची स्थापना केली असल्याचे सांगितले. आरोग्य विभागाची पदभरती ही गुणवत्तेवरच व्हावी. गरज पडल्यास पदभरतीची प्रक्रिया पुन्हा राबविण्याची सूचना संबंधित विभागाला केली.

विमानतळासाठी जागा शोधा

परभणी जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागास असून येथे उद्योग उभारणीसाठी उद्योजकांना सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्या लागणार आहेत. त्यासाठी परभणी येथे विमानतळ धावपट्टीसाठी जागा शोधण्याची सूचना श्री. पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली.

बसस्थानक परिसर स्वच्छ करून तिथे पावसाळ्यात वृक्षारोपण करण्याच्या विभागीय नियंत्रकास सूचना दिल्या. पाथरी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा विकास करताना पुण्यातील चाफ ेकर स्मारक, साईबाबा संस्थानाच्या धर्तीवर कामे करण्याचे निर्देश दिले. प्रादेशिक पर्यटन योजनेतून सायन्स पार्कसाठी मंजूर निधीबाबत त्यांनी माहिती घेतली. राज्य उत्पादन शुल्क विभागाने कामात कोणतीही दिरंगाई न करण्याच्या सूचना दिल्या. ताडकळस-सिंगणापूर येथील उड्डाणपूल बांधकाम, न्यायालयीन इमारत बांधकाम, ताडकळस धानोरा येथील नदीवरील पुलाचे बांधकाम, येलदरी येथील पुर्णा नदीवरील पुलाचे बांधकाम, परभणी पोलीस वसाहत बांधकाम, मागेल त्याला सौर कृषिपंपाचा आढावा श्री. पवार यांनी घेतला. सायबर गुन्ह्यांवर विशेष लक्ष देण्याबरोबरच गुन्हेसिद्धीसाठी एआयचा वापर करावा. अशी सुचनाही त्यांनी केली जिल्हाधिकारी श्री. गावडे व पोलीस अधीक्षक यांनी श्री. परदेशी यांनी सादरीकरणाव्दारे यावेळी सविस्तर माहिती दिली. बैठकीच्या प्रारंभी पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. बैठकीस सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### जिंतूरातील मुस्लिमांनी दिल्या पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा, पहेलगाम हल्याचा निषेध

**जिंतूर,/प्रतिनिधी :** काश्मीर मधील पहेलगाम येथे अतिरेक्यांनी भ्याड हल्ला करत २८ निरपराध पर्यटकांना ठार मारले या घटनेच्या निषेधार्त शहरातील मुस्लिम बांधवानी शुक्रवार दि २५ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता एकत्र येत कँडल मार्च काढत अतिरेकी हल्ल्याचा व पाकिस्तान चा निषेध करून मृतांना श्रध्दांजली वाहिली या बाबत तहसीलदार राजेश सरवदे यांच्या मार्फत पंतप्रधानांना पाठवलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की या हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व पर्यटक व काश्मिरी नागरिकांना प्रत्येकी ५० लाख रु आर्थिक मदत देण्यात यावी.या हल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन दहशतवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यात यावे जेणे करून भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत किंवा असे करण्याची कोणाची हिंम्मत होणार नाही.पाकिस्तान मधील दहशतवादी अड्ड्यावर सर्जिकल स्ट्राईक करण्यात यावे.पाक खेळाडू,गायक,कलाकार, नागरिकांना भारतीय व्हिसा नाकारण्यात यावा. तसेच संयुक्त राष्ट्रसंघात या बाबत आवाज उठवून कडक निर्बंध लादण्यात यावे.आर्थिक व्यापारावर बंदी घालण्यात यावी या सहा अनेक मागण्याचा समावेश आहे

शहरातील दादा शरीफ चौकातून सकल मुस्लिम तरुणांच्या वतीने पाकिस्तान मुर्दाबाद, आतंकवाद मुरदाबाद,हिंदू मुस्लिम भाई भाई च्या घोषणा देत मुख्य चौक,पोलीस स्थानक,छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्याने बस स्थनाका समोरील शहीद अब्दुल हमीद चौका पर्यंत कँडल मार्च काढण्यात आला. या ठिकाणी एड. शोएब सिद्दीकी, सुलेमान काझी, डॉ इरफान अगाई पटेल यांनी उपस्थित तरुणांना संबोधित करून हल्ल्यात ठार झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी टिपू सुलतान ब्रिगेड, माजी नगरसेवकांनी परिश्रम घेतले.

### सेलूत स्टेट बँक इंडियाची ए. एम. सी. सी. ऋण शाखा -११ शाखांचा भार,जलद ऋण निपटारा

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील सर्वोदय नगर रस्त्यासमोर भारतीय स्टेट बँक ए.एम.सी.सी या ऋण मंजुरी शाखेचे उद्घाटन गूरूवार २४ एप्रिल रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया नांदेड झोनचे डेप्यूटी मॅनेजर प्रियकुमार सारिगला यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी परभणी रिजनल मॅनेजर सम्राट पुरकायस्थ व एएमसीसी चे चीफ मॅनेजर दिपक देसाई,आनंत गावडे आदींची उपस्थिती होती.यावेळी ग्राहकांना प्रियकुमार सारिगला यांच्या हस्ते कर्ज मंजुरी पत्र देण्यात आले. पूढे बोलताना सारगिला म्हणाले की ग्राहकांच्या कर्ज प्रकारणाला संबंधीत शाखेत विलंब होत असल्याने भारतीय स्टेट बँकने ए एमसीसी शाखेसाठी आपल्या सेलूची निवड केली आहे यामुळे शेतकरी कर्ज ,शैक्षणिक कर्ज व व्यावसायीक कर्जास पन्नास लाख रुपये पर्यंत मंजूरी मिळेल आपणा मूख्यशाखा परभणी येथे जाण्याची गरज नाही तर भविष्यात पन्नास लाखांच्या वरिल व्यवसाय कर्जांच्या मंजूरीसाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिंतूर तालुका अध्यक्षपदी गजानन काळे जिल्हा संघटकपदी शाम मस्के तर शहर अध्यक्ष सिताराम कंठाळे

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यात संत सावता महाराज मंदिरामध्ये शनिवारी दुपारी बारा वाजता नाभिक समाजाची बैठक संपन्न झाली.



या बैठकीस जिल्हाध्यक्ष संपतराव सोनवणे नाभिक संघटनेचे प्रदेश सरचिटणीस पांडुरंग जी भवर गोविंद भालेराव व मराठा उपसंघटक कृष्णा कंठाळे मावळते तालुका अध्यक्ष हनुमान कंटाळे व मावळते शहराध्यक्ष श्याम मस्के ही उपस्थित होते. दुपारी निवडणूक निर्वाचन अधिकारी म्हणून संपतराव सवणे यांनी जिंतूर तालुका अध्यक्षपदाच्या निवडीसाठी बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा होती परंतु तशी न होता तालुका अध्यक्ष ची नीवडणुक हि मतदान घेऊन करण्यात आली त्यानंतर त्यानंतर नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष संपतरावजी सामने यांनीउमेदवारी अर्ज मागविण्यात आले चार उमेदवार होते त्यापैकी गजानन काळे यांना ३५ मते मिळाली तर श्याम मस्के यांना २९ मते मिळाली निवडणूक निर्वाचन अधिकारी यांनी गजानन काळे यांना तालुका अध्यक्ष म्हणून घोषित केले आणि शहराध्यक्ष सिताराम कंठाळे तर जिल्हा संघटक श्याम मस्के यांची निवड घोषित केली निवड घोषित झाल्यानंतर तालुका अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्या मनोगतात तालुका अध्यक्ष म्हणाले कि गजानन काळे म्हणाले की मी जिंतूर तालुका व ग्रामीण भागातील नाभिक समाजाचे अनेक प्रश्न राहिलेले आहेत राहिलेले प्रश्न मी पूर्णपणे मार्गी लावण्याचे काम करणार तसेच तळागाळातील नाभिक समाजाची पंचायत समिती तहसील व इतर कोणत्याही प्रकारचे काम असो ते मी पूर्णपणे करणार व नाभिक संघटनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष कल्याण रावजी दळे साहेब यांनी जो आदेश देतील त्या आदेशाचे त्या आदेशाचे मी पालन करणार या नाभीक समाजाचे अनेक प्रश्न राहिलेले आहेत ते प्रश्न मार्गी लावण्याचे का मीकाम करणार या बैठकीस ग्रामीण भागातील व शहरी भागातील नाभिक समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता या बैठकीस प्रदेश सरचिटणीस पांडुरंग जीभवर युवक जिल्हाध्यक्ष संपतराव सवणे युवक जिल्हाध्यक्ष गोवीदभालेराव कार्याध्यक्ष आत्माराम जी राऊत मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष कृष्णाजी कंठाळे हनुमान कंठाळे पत्रकार रामप्रसाद कंठाळे श्याम मस्केयांच्यासह अनेक मान्यवर नाभिक समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## राष्ट्रवादी ओबीसी तालुका अध्यक्षपदी गजानन वराड यांची निवड



**जिंतूर,/प्रतिनिधी** तालुक्यातील सायखेडा बु येथील जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा सरपंच सायखेडाबु येथील गजानन वराड यांची राष्ट्रवादी अजितदादा गट ओबीसी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीचे पत्र जिंतूर तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत यांनी काल नुकतेच देण्यात आले आहे यावेळी गजानन वराड म्हणाले की मी अजित दादा व सुनील दादा तटकरे राष्ट्रवादीचे नेते यांचे राष्ट्रवादी पक्ष तळागाळातील जनतेपर्यंत नेणार तसेच माझ्यावर जिम्मेदारी टाकलेली त्या पदाचा वापर मी योग्य रीतीने करणार व ओबीसी समाजातील शेवटच्या क्षणापर्यंत व शेवटच्या माणसापर्यंत अजित दादांचे विचार नेनार राष्ट्रवादी पक्षासाठी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामपंचायत यामध्ये जास्तीत जास्त राष्ट्रवादीच्या जागा निवडून आणणार असे ते म्हणाले या निवडीचे त्यांचे स्वागत करण्यात आले या निवडीबद्दल जिंतूर सेलु विधानसभा प्रमुख सुरेश भैया नागरे अविनाश काळे नानासाहेब राऊत लक्ष्मण दादा बुधवंत यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले व ओबीसी समाजातर्फे गजानन वराड यांची निवड झाल्याबद्दल जिंतूर मध्ये फटाकेचे आतिषबाजी करून त्यांचे स्वागत करण्यात आले

## जिल्हा परिषदेच्या शाळा स्पर्धा परिक्षेसाठी अनुकूल करा सीईओ नतिशा माथुर यांच्या सूचना

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अनेक शाळांमधून स्पर्धा परीक्षेचे काम उत्तमपणे पार पाडले जाते. मात्र सर्व शाळांमधून या पध्दतीचे काम होत नाही. यामध्ये सर्वसमावेशकता येण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा स्पर्धा परिक्षेसाठी अनुकूल कराव्यात, अशा सुचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी दिल्या.

येथील जिल्हा परिषदेच्या सभागृहात शनिवारी (दि.२६) सीईओ माथूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) संजय ससाणे यांची उपस्थिती होती. या बैठकीत गट शिक्षणाधिकारी, एक समन्वयक म्हणून साधन व्यक्ती, विषय तज्ञ, तालुक्यात नवोदय, शिष्यवृत्ती, एनएमएमएस यावर काम करणारे दोन यशस्वी शिक्षक घेऊन टीम तयार करण्यात आली. जिल्ह्यावर इयत्ता पाचवीसाठी व इयत्ता आठवीसाठी काम करण्यासाठी दोन स्वतंत्र सेल तयार करण्यात आले आहेत.

## मजुरां अभावी शेती व्यवसाय धोक्यात, पाडवा झाला तरी सालगडी मिळेना; मजुरीचे दर परवडेनासे झाले

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सालगडी व मजुरांचे दर वाढल्यामुळे सोनपेठ तालुक्यातील शेती व्यवसाय धोक्यात आला असून शेतकऱ्यांना शेती करणे कठीण झाले आहे. एकीकडे शेतीमालाला किफायतशीर भाव मिळत नाही तर दुसरीकडे शेती उत्पादनासाठी लागणाऱ्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

त्यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. दरवर्षी गुढीपाडव्याला शेतकऱ्यांचे सालगडी ठरत असतात परंतु यावर्षी गुढी पाडवा संपला तरी अनेकांना सालगडी मिळाले नाहीत. त्यामुळे पेरणीचे दिवस जसजसे जवळ येत आहेत तसतसे शेतकऱ्यांची चिंता वाढत चालली आहे. शेती व्यवसायातील रोजंदारी करण्यास नवीन पिढी धजावत नसल्याने मजुरांची टंचाई जाणवत आहे. सालगड्यांचा सध्या दर एक लाख तीस हजार ते दीड लाख रुपयांपर्यंत पोहोचला असून, शेतीवर काम करण्यासाठी मजुराची रोजंदारी पुरुष ५०० ते ७०० रुपये तर महिला २०० ते ३०० रुपये दिवसाचा रोजगार झाला



आहे. एवढा रोजगार देऊन ही ऐनवेळी मजूर उपलब्ध होत नसल्यामुळे शेती व्यवसाय संकटात सापडला आहे. त्या पटीत शेती उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. आणि मिळणाऱ्या उत्पादनातून शेती खर्च व मजुराचा खर्च वजा केला असता शेतकऱ्याचा नफा शून्यावर येऊन टेकतो तर कधी कधी तोट्यात जातो त्यामुळे शेतकऱ्यांनाही शेती करणे आता नकोशी झाली आहे. गतवर्षीच्या कापसाची अनेकांनी फरदड घेतली असून ती वेचण्यासाठी सध्या मजूर मिळत नाहीत. परिणामी पांढरा शुभ्र फुटलेला कापूस वेचणी अभावी शेतीवर उभा आहे. फरदड कापूस वेचण्यासाठी वेळेवर मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना फरदड कापूस काढून उन्हाळी मशागतीची चिंता लागली आहे. त्यातच वेचणीसाठी प्रति किलो २५ ते ३० रुपयाचा भाव द्यावा लागत आहे. शेतीच्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांपासून स्थानिक पातळीवर शेतमजुरांची टंचाई जाणवत आहे. एकीकडे मजुरी दरात वाढ झाली त्यातच अधिकचे पैसे मोजूनही कामे वेळेत होत नसल्याने मजुरांच्या विनवण्या करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. दरवर्षी कापूस वेचणीच्या हंगामात मध्यप्रदेश येथील मजुरांचे सोनपेठ तालुक्यात आगमन होत असते. परंतु यावेळी मध्यप्रदेशातील मजूर कमी प्रमाणात आले होते आणि ते लवकरच परतले असल्याने शेतकऱ्यांमध्ये मजूर टंचाई निर्माण झाली.

बाहेरून येणाऱ्या मजुरांसाठी निवारा, फिल्टर पाणी, लाईट इत्यादींची सोय करून द्यावी लागते तर मजुरांना दरही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे द्यावा लागतो. यावेळी रब्बी ज्वारी काढणीच्या हंगामात ही अशीच शेतकऱ्यांची फजिती उडाली ज्वारी काढणीसाठी बटई घेतलेल्या मजुरांना झालेली सर्वच जवारी गेली

**जगाच्या भाकरीची चिंता करणाऱ्या शेतकऱ्याप्रती सरकारची भूमिका स्पष्ट नाही. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही आणि नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांच्या पिक विम्याची रक्कम ही वेळेवर आणि पूर्णपणे दिली जात नाही. त्यामुळे तालुक्यातील जगाच्या पोशिंद्याला आता झोळी घेण्याची वेळ आली आहे. त्यातूनच वाढत्या शेतकरी आत्महत्या हा विषय सरकारने गांभीर्याने घेतला पाहिजे.**

**-विश्वंभर गोरवे**
**(तालुकाध्यक्ष, शेतकरी संघटना सोनपेठ)**

**तर शेतकऱ्याला मात्र चिपाडं उरली. तालुक्यात नवीन शेतकरी घडत नाहीत त्यामुळे शेतीमध्ये काम करण्यास कोणीच धजावत नाही. नवीन युवा पिढी शेतीतील रोजंदारीपेक्षा इतर बाजारपेठेतील दुकानांवर अथवा बाहेरगावी कंपनीमध्ये काम करण्यास पसंती देतात. त्यामुळे सालगडी व रोजंदार मजुरांचे दर आवाक्या बाहेर गेले आहेत.**

**-सुधीर बिंदू**
**(प्रदेश नेते, शेतकरी संघटना)**



# गावठी कट्ट्यासह जिवंत काडतूस जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२७ एप्रिल-**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि.२६ एप्रिल रोजी शहरातील ढवळे कॉर्नर परिसरातून एकाकडून एक गावठी कट्टा व एक जिवंत काडतूस जप्त केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या फ्लॅश आऊट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांचे पथक दि.२६ एप्रिल रोजी शहरात गस्त घालत असताना दुध डेअरी ते ढवळे कॉर्नर मार्गावर पानटपरीजवळ एकाकडे गावठी पिस्टल असल्याची माहिती त्यांना मिळाली. या माहितीवरुन पथकाने घटनास्थळी जावून शेख आदिल शेख शकील यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून २५ हजार पाचशे रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस जप्त केले. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून, शेख आदिल याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे, पोलीस अंमलदार देवा चव्हाण, मोतीराम पवार, मिलिंद नरबाग, मारोती मारे, मारोती मुंढे, सायबर सेलचे राजू सिटीकर, दिपक ओढणे, सुधाकर देवकत्ते यांच्या पथकाने केली.

# गोदावरी काठावर तथागतांचे स्तूप उभारण्यासाठी कटिबद्ध : आ. बनसोडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२७ एप्रिल-**

नांदेड शहरातील गोदावरी नदीकाठावर विश्वशांती दूत , तथागत गौतम बुद्ध यांचे स्तूप उभारण्यासाठी आणि १०५ फूट उंचीची बुद्ध मूर्ती स्थापन करण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करू असा विश्वास राज्याचे माजी मंत्री तथा उदगीरचे विद्यमान आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. डॉ.बी आर आंबेडकर फाउंडेशन च्या वतीने काल कृष्णाई पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महातेरो , भंते पयाबोधी थेरो यांच्यासह आ. भीमराव केराम , आ. प्रतापराव पाटील चिखलीकर , माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, ना. जयदीप भाई कवाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी , बी आर आंबेडकर फाउंडेशन चे अध्यक्ष बापूसाहेब गजभारे , सचिव आकाश गजभारे , स्वागताध्यक्ष पंढरीनाथ बोकारे सतीश बनसोडे विनोद भरणे साहेबराव सोनकांबळे आदींची उपस्थित होती.

पत्रकारितेसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी कृष्णाई पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला यात. स्मृतीशेष मनोज नागोराव गजभारे यांच्या स्मृतीपित्यार्थ देण्यात येणारा प्रज्ञावंत विद्यार्थी पुरस्कार कुमारी शीतल संतोष गोमस्कर यांना प्रदान करण्यात आला. फोटोग्राफी आणि ग्रामीण पत्राकारितेसाठीसाठी हाफिस घडीवाला , पत्रकारिता , शिक्षण , कामगार चळवळीसाठी प्रदीप नागपूरकर , पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रासाठी राम तरटे यांना यावेळी कृष्णाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक, राजकीय आणि धम्म कार्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल माजी मंत्री तथा उदगीरचे विद्यमान आमदार संजयजी बनसोडे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . रोख रक्कम , मानपत्र शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते.तर याचवेळी नांदेड शहरात गोदावरी नदीच्या काठावर तथागत बुद्धांची मूर्ती स्थापन करण्यासाठी शासनाकडे ७५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करणारे महानगरपालिकेचे आयुक्त महेश कुमार डोईफोडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. डोईफोडे यांच्यावतीने महापालिकेची अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी हा सन्मानित स्वीकारला.

प्रारंभी महामानवांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन करण्यात आले. त्यानंतर पूज्य भंते पय्यंबोधी थेरो आणि पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी उपस्थितान आशीर्वाद दिला.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्याईमुळे मी आमदार झालो. या राज्याचा मंत्री झालो. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा घेऊन समाजाच्या उत्थानासाठी सातत्याने प्रयत्न करत राहिलो . माझ्या हातून जे जे चांगले करता येईल ते ते करण्याचा मी प्रयत्न केला . केवळ उदगीर येथे बुद्ध विहार उभारले नाही तर राज्यातील विविध भागात आंबेडकरी चळवळला बळ देण्यासाठी बुद्ध विहारांना मंजुरी दिली. त्यांच्यासाठी निधी दिली. याच वेळी सर्व धर्माच्या सर्व घटकांसाठी ही मंदिर, मजिदी उभारण्यासाठी ही निधी



उपलब्ध करून दिला. बापूसाहेब गजभारे यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये गोदावरी काठावरती तथागत भगवान बुद्धांची मूर्ती स्थापन करण्यासाठी जो ठराव पारित केला होता. तो ठरावाचे मान्यतेसाठी राज्य सरकारकडे दाखल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून येथे बुद्ध मूर्ती स्थापनेसाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करू आणि लवकरच नांदेडमध्ये बुद्ध मूर्तीची स्थापना होईल असा विश्वासही त्यांनी दिला.

दरम्यान यावेळी बोलताना आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बापूराव गजभारे यांच्या कार्याचा गौरव करत गोदावरी काठावरील बुद्धमूर्ती स्थापनेसाठी जो ठराव महापालिकेकडे देण्यात आला होता तो ठराव काही लोकांनी बाजूला ठेवला होता मात्र मी खासदार असताना या ठरावाला मंजुरी देऊन राज्य सरकारकडे पाठवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. भविष्यात आंबेडकरी चळवळीला बळ देण्यासाठी आपण काम करत राहू. येथे अत्यंत सुंदर आणि विश्वाला शांती देणारा तथागत भगवान बुद्धाचे भव्य स्तूप उभारले जाईल असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव केराम म्हणाले की , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे माझ्यासारखा आदिवासी भागातील कार्यकर्ता आमदार म्हणून निवडून आला. तळागाळातील शेवटच्या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी माझा प्रयत्न सातत्याने सुरू आहे . बुद्ध विहार उभारणीसाठीच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना प्रेरणा देण्यासाठी जी जी संधी मिळेल ती संधी उपलब्ध करून देण्यासाठी माझा सातत्याने प्रयत्न असतो. बापूसाहेब गजभारे यांचे आणि आमचे जुने स्नेह संबंध आहेत त्यामुळे आयोजित करण्यात आलेला डॉ. बी. आर. आंबेडकर फाउंडेशनचा पुरस्कार सोहळा पुरस्कार प्राप्त मान्यवरांना आणि इतरांनाही सातत्याने प्रेरणा देत राहील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध राहिले पाहिजे.भाई जयदीप कवाडे यांचेही यावेळी समायोचीत भाषण झाले. प्रास्ताविक बापूसाहेब गजभारे यांनी केले तर आभार आकाश गजभारे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार राम तरटे यांनी केले.

# आठवडी बाजारासाठी आ. केरामांनी उपलब्ध करून दिले मैदान



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२७ एप्रिल-**

रस्त्यावर भरणाऱ्या आठवडी बाजाराचा प्रश्न मार्गी लागला असून आमदार भीमराव केराम यांच्या सूचनेनुसार किनवट नगरपालिकेने २७ एप्रिल रोजी छोटे मोठे व्यापारी व शेतकऱ्यांना हुतात्मा गोंडराजे मैदानाची जागा उपलब्ध करून दिल्यामुळे रस्त्यानी मोकळा श्वास घेतला आहे. गोंडराजे मैदानातील पर्यायी जागा ही व्यापारी, शेतकरी व नागरिकांसाठी अत्यंत सोयीची ठरणार असल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

किनवट शहरातील विविध विकासात्मक कामे तसेच पाणी टंचाई संदर्भात आमदार भीमराव केराम यांनी २ एप्रिल २०२५ रोजी रोजी नगरपरिषद कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत हुतात्मा गोंडराजे मैदानाच्या तीनही बाजूकडील मुख्य रस्त्यावर भरणाऱ्या रविवारच्या आठवडी बाजारामुळे वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे छोटे मोठे व्यापारी तसेच बाहेर गावाहून भाजीपाला घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार व उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार व शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेणीवार यांनी आमदार भीमराव केराम यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन आ. केराम यांनी आठवडी बाजारासाठी पर्याय व्यवस्था म्हणून हुतात्मा शंकरशहा रघुनाथशहा गोंडराजे मैदानाची जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना नगरपालिका प्रशासनाला दिल्या होत्या. या सूचनाची २७ एप्रिल रोजी अंमलबजावणी करण्यात आली असून मुख्याधिकारी डॉ.अजय कुरवाडे,कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांनी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन सकाळी ९ वा.रस्त्यावरील आठवडी बाजाराचे हुतात्मा गोंडराजे मैदानात स्थलांतर करण्याची मोहीम राबविली आहे. या मोहिमेमुळे प्रमुख रस्ते मोकळे झाले आहेत.

दिवसेंदिवस आठवडी बाजाराचा विस्तार होत असल्याने छोटे मोठे व्यापारी व शेतकऱ्यांची जागेअभावी गैरसोय होत होती. बाजाराच्या दिवशी पोस्ट ऑफिस ते अण्णाभाऊ साठे पुतळ्यापर्यन्त रस्त्याच्या दुतर्फा बाजार भरत होता. विशेषतः अग्निशमन केंद्रा समोरील रस्त्यावरील बाजारामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन तातडीच्या प्रसंगी अग्निशमन दलाची गाडी केंद्राबाहेर काढण्यास अडथळा निर्माण होत होता. यापूर्वी कित्येक वेळा बाजारपेठेतील गर्दीमुळे रुग्णवाहिका अडकून पाडण्याचे प्रसंग उद्भवत होते. मात्र आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नातून वाढत्या आठवडी बाजाराचा प्रश्न मार्गी लागला असून हुतात्मा गोंडराजे मैदानाची प्रशस्त जागा उपलब्ध झाल्यान छोटे-मोठे व्यापारी व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे तर रस्ते मोकळे झाल्याने वाहनधारक व नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

# हदगाव तालुक्यातील ११८ सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२७ एप्रिल-**

हदगाव तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत २०२५-३० या कालावधीसाठी दि.२५ एप्रिल रोजी तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच हदगावचे तहसीलदार सुरेखा नांदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरक्षण सोडत करण्यात आले ही सगळी प्रक्रिया इन कॅमेरे पार पडण्यात आली. यावेळी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार चामनीकर, रत्नाकर डांगरे यांच्यासह विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

एकुण ११८ ग्रामपंचायती मधून सर्व प्रथम अनुसूचीत जातीच्या प्रवर्गासाठी आरक्षणाची कार्यवाही सुरु करण्यात आली. यासाठी एकुण ग्रामपंचायत अनु. जातीच्या लोकसंख्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने घेण्यात आली. सन-२००५, २०१०,२०१५ व २०२० या वर्षामध्ये ज्या ग्रामपंचायतींना अनु. जाती या प्रवर्गासाठी आरक्षण देण्यात आले होते अशा ग्रामपंचायत वगळण्यात आल्या व उर्वरीत ग्रामपंचायत मध्ये चक्राकार पद्धतीने अनु. जाती २६ अनुसूचित जाती साठी व त्यातील महिला १३ जागा, तर अनु. जमाती साठी आरक्षित एकुण १५ ग्राम पंचायत मधून ०८ ग्राम पंचायती महिलासाठी आरक्षीत करण्यात आले. तसेच १८नामाप्र साठी ग्रामपंचायत आरक्षीत झाल्यानंतर त्यातून ९ ग्रामपंचायत नामाप्र महिलांसाठी आरक्षित करण्यासाठी नामप्र महिला आरक्षणासाठी यापुर्वी एकदाही नामात्र महिला आरक्षण नसलेल्या ०६ ग्रामपंचायती पात्र ठरविण्यात आल्या. यानंतर उर्वरीत ५९ ग्रामपंचायती सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटलेल्या आहेत. ५९ ग्राम पंचायत मधून ३० ग्राम पंचायती सर्वसाधारण महिलासाठी आरक्षित करण्यात आले आहे. अशाप्रकारे हदगाव तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत पार पडली.

# खतगांवात बाळू मामांच्या मेंढरांचा पालखीतळ मुक्कामी

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.२७ एप्रिल-**

बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव नगरीत श्री.संत सद्गुरू बाळू मामांची पालखी व मेंढरांचा तळ मुक्कामी आला आहे.शुक्रवार दि.२५ रोजी सायंकाळी खतगांव नगरीत येऊन तीन दिवस उलटले आहेत.

खतगांव परिसरातील भाविक भक्तांची दर्शनास दररोज गर्दी होताना दिसून येत आहे. येथील सद्गुरू बाळूमामांची ही १२ व्या क्रमांकाची पालखी आहे.महाराष्ट्रात बाळूमामांच्या मेंढरांचे तब्बल १९ तळ ग्रामीण भागात विराजमान आहेत.सकाळ, संध्याकाळ आरती,महाप्रसाद अन्नदान व बाळूमामांनी आयुष्यात व्यतीत केलेल्या चमत्कारिक बाबींचे रसाळ विवेचनही ऐकायला मिळत आहे. तळात अनेक सेवेकरी भक्तांचाही उत्तुंग मनोभावे सहभाग आहे.

या सदरील बग्गीचे कारभारी यशवंत भाऊ सुरनर बनवसकर हे आहेत.सोमवार दि.२८ एप्रिल रोजी सायंकाळपासून ते मंगळवार दि.२९ रोजी दुपारी बारा वाजेपर्यंत बाळूमामांचा भार उतरवणे(अर्थात लक्ष्मीरूपी मेंढ्यांच्या लोकरीचे जावळ काजण) कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# डॉ. आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि.२७ एप्रिल-**

येथून जवळच असलेल्या मौजे हुस्सा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही परमपूज्य विश्वरत्न भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती विविध उपक्रमाने हुस्सा येथील बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे.

प्रारंभी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, सत्यशोधक महात्मा फुले, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, संत गाडगे महाराज, सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ साठे, यांच्या प्रतिमेचे पूजन करून पंचशील अष्टगाथा यांचे पठण करून पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण हुस्सा नगरीचे सरपंच रमेश पाटील हंबर्डे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले आहे. सायंकाळी पाच वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रमेश पाटील हंबर्डे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पत्रकार महादेव बैलकवाड, युवा कार्यकर्ते सुरज पाटील शिंदे, नंदकिशोर हंबर्डे, मधुकर हंबर्डे आदी उपस्थित होते.

यावेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष संदीप गायकवाड मारुती गायकवाड उत्तम गायकवाड प्रकाश गायकवाड , उमेश गायकवाड, गौतम भगतकर, गौतम गायकवाड, माधव गायकवाड, दिगंबर धनकवाड, नामदेव भगतकर, शंकर वाघमारे, पांडुरंग वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, आनंदा वाघमारे, किशोर वाघमारे, अविनाश वाघमारे, दत्ता तेलंगे, लक्ष्मण तेलंगे, भाऊराव तेलंगे, भाऊराव तेलंगे उपस्थित होते.

# डॉ. मीनलताईंच्या सदस्य नोंदणी कामाची उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून प्रशंसा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२७ एप्रिल-**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्य नोंदणी अभियानात सक्रिय सहभाग घेत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य डॉ. मीनलताई खतगावकर यांनी देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघात २५ हजार सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला आहे . सदस्य नोंदणीच्या या उत्कृष्ट कार्याची प्रशंसा उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी केली आहे . उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे काल नांदेड हिंगोलीच्या दौऱ्यावर आले असता वसमत येथे डॉ. मीनलताई खतगावकर यांनी त्यांची भेट घेतली. आपल्या सदस्य नोंदणीसह राष्ट्रवादी काँग्रेस मधील कार्याचा अहवाल यांनी सादर केला.

महाराष्ट्राच्या राजकारणातील कणखर नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यावर सदस्य नोंदणीच्या अभियानाला सुरुवात करण्याचे आदेश दिले होते . नांदेड जिल्ह्यात माजी मंत्री तथा जिल्ह्याचे नेते माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या डॉ. मीनलताई खतगावकर यांनी देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघात सदस्य नोंदणी मध्ये विशेष लक्ष दिले आणि देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघात अल्पावधीतच तब्बल २५ हजार सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला. या सदस्य नोंदणीचा अहवाल त्यांनी काल अजित दादा



पवार यांना वसमत भेटीमध्ये दिला. देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी , कार्यकर्ते आणि सदस्यांची वैयक्तिक माहिती ही अजितदादा पवारांपर्यंत यांच्याकडे सुपूर्द केली. प्रत्येक कार्यकर्त्यांचा श्र संपर्क क्रमांक ,छायाचित्र , त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती असा कार्य अहवाल त्यांनी सादर केला. आगामी काळात देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघासह नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करू असा विश्वासही यावेळी डॉ मीनलताई खतगावकर यांनी दिला आहे. डॉ .मीनलताई खतगावकर यांच्या या उत्तम कार्याची उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी प्रशंसा केली . भविष्याच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या । यावेळी माजी मंत्री नवाब मलिक , आमदार विक्रम काळे , आम. राजू भैया नवघरे , माजी आमदार ओमप्रकाश पोकर्ण , प्रवक्ते सुरज चव्हाण, दीपक पावडे , भास्कर पाटील भिलवंडे , राजू गंदिगुडे , श्याम चोंडे , सुरेश पाटील खंडगावकर आदींची उपस्थिती होती.

# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ इस्लापूर बाजारपेठ कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.२७ एप्रिल-**

पहलगाम काश्मीर येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय नागरिकांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इस्लापूर येथ २७ एप्रिल रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने कडकडीत बंद ठेवण्यात आला.

पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय नागरिकांवर अंदाधुंद गोळीबार करून २७ हून अधिक लोकांचा निष्पाप बळी घेतला या घटनेचा जाहीर निषेध करून हे क्रूर कर्म करणाऱ्या



दहशतवाद्यांवर कडक कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी ही

मागणी सकल हिंदू समाजाच्या निवेदनात करण्यात आली. २७ एप्रिल रोजी बंदचे सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले होते इस्लापूर शहरात बंदला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला दुकाने, हॉटेल, व्यापार, भाजीपाला, अडत व्यापार, कापड, किराणा सर्व व्यापार बंद होते सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी शहरात चोख बंदोबस्त ठेवला होता सर्वांनी शांततेत बंद पाळला.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नांदेड दक्षिण मोरे, उत्तरच्या आध्यपदी लक्ष्मीकांत मुळे

**अर्धापूर-** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मराठवाडा विभागीय बैठक संभाजीनगरातील संघटनेच्या कार्यालयात शनिवारी् दि २६ एप्रिल रोजी प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली .या बैठकीत मराठवाड्यातील आठही जिल्ह्याच्या आध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली.या बैठकीत नांदेड जिल्हा दक्षिणच्या आध्यक्षपदी संग्राम मोरे तर उत्तरच्या



जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मीकांत मुळे यांची निवड घोषित करण्यात आली व या बैठकीत नियुक्तीपत्र देण्यात आले. या बैठकीत नांदेड जिल्हा दक्षिणच्या आध्यक्षपदी संग्राम मोरे तर उत्तरच्या आध्यपदी लक्ष्मीकांत मुळे, नांदेड शहराध्यक्षपदी मुनतजीबोद्दिन, मराठवाडा उपाध्यक्ष सुरेश जोंधळे, नांदेड जिल्हा निवड समिती अध्यक्ष केशव पवार् यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली तसेच मराठवाड्यातील नांदेड सह हिंगोली, बीड, जालना, संभाजीनगर लातूर या जिल्ह्यात तील व प्रदेश पातळीवरील नियुक्ती जाहीर करण्यात आल्या आहेत.यावेळी तालुका अध्यक्ष गुणवंत विरकर, रमेश पवार, पिंटू घोगरे पाटील आदी उपस्थित होते.या् बैठकीला मराठवाड्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# देगलूर तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.२७ एप्रिल-**

तालुक्यातील ग्रामपंचायती आरक्षण सोडतीतून गाव, वाड्या व तांड्यांतील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत शुक्रवारी (दि.२५ एप्रिल) देगलूर येथील पंचायत समितीच्या सभागृहात पार पडल्या. या सोडतीतून कहीं खुशी, कहीं गम असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले. सन २०२५-३० कालावधीसाठी आरक्षण निश्चितया सोडतीतून देगलूर तालुक्यातील एकूण ९० ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या काल विधीसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. प्रत्येक गावातील तहसीलदारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोडतीदरम्यान अनेक इच्छुक उमेदवार उपस्थित होते. काहींना आरक्षणामुळे अपेक्षेप्रमाणे संधी मिळाली, तर काहींच्या आशावर विरजण पडले.

राजकीय दृष्टिकोनातून संवेदनशील गावांमध्ये विशेष लक्षतालुक्यातील काही राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या गावांमध्ये आरक्षण कोणाला लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला, तर काहींच्या चेहऱ्यावर निराशा झळकली.

आरक्षण सोडत ही शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते पार पडली ही सोडत साई गणेश पोकलबार आणि सजफा बाजीद पठाण (इयत्ता तिसरी) या विद्यार्थ्यांच्या हस्ते



काढण्यात आली. यावेळी तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी आरक्षण जाहीर केले. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा सनियंत्रण अधिकारी अनुप पाटील, नायब तहसीलदार गिरीष सरकुलवार, महसूल अधिकारी व इतर विविध विभागांचे अधिकारी तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

**एससी, ओबीसी, एसटी महिलांसाठीची राखीव गावे**

आचेगाव, कारेगाव, चाकूर, देगाव (बु) देवापूर, बळेगाव, मुजळगा सांगवीउमर, करडखेड सांगवी, भक्तापूर, लिगंनकेरूर, वझरगा ही गावे एससी महिलांसाठी आहेत. तर ओबीसी महिलांसाठी राखीव गावे आलुर, कुमारपल्ली, कोकलगाव तहखेल, बडीसावरगाव, नागराळ (पिंपळगाव) बागनटाकळी, मंडगी, शेळगाव आहेत. तर, ओबीसी पुरुषासाठी हाळी, चैनपुर झरी, टाकळी, नंदूर, कुशावाडी, लखा मरतोळी ही गावे आहेत. दरम्यान, एसटी प्रवर्गासाठी सरपंचपद वळग येरगी, तर एसटी महिलेसाठी करेमलकापूर, कावळगाव, कावळगडा ही गावे राखीव आहेत.

**सर्वसाधारणासाठी सुटलेल्या ग्रामपंचायती**

अंबुलगा, इब्राहिमपूर (आलापूर) किनी, कुडली, कुरुडगी, केदारकुंठा क्षीरसमुद्र, खानापूर, तमलुर, नरंगल बिजलवाडी, बेबंरा, भायेगाव, मरखेल, मानूर, मेदनकल्लूर, शहापूर शेवाळा, सोमुर, हावरगा, होटटल शिवनी.

**सर्वसाधारण महिलेसाठी सुटलेल्या जागा**

अंतापूर, आमदापूर, कबीरवाडी, काठेवाडी, कामाजीवाडी, खुतमापूर, गवंडगाव, गोगलागोविंद तांडा, डोसणी, देरेगाव दावणगीर, निपाणी सावरगाव, भुतन हिप्परगा, भोकसखेडा, माळेगाव (मक्ता) येडूर, रमतापूर, रामपूर, वझर, शिळवणी, सुंडगी, सुगाव.